श्री

इतिहासाचार्य

# विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचे चरित्र
# भाग पहिला
## राजवाडे चरित्राची पार्श्वभूमी व राजवाडे विचारसंप्रदाय

'राष्ट्रा-राष्ट्रांत जो जीवनार्थ कलह चालला आहे, त्या कलहात उत्साहाने शिरण्याची जर इच्छा व आवश्यकता असेल तर त्या कलहार्थ लागणारी साधने ही आपल्यापाशी इतरांपेक्षा श्रेष्ठ निदान इतरांच्या बरोबरीची तरी असणे अवश्य आहे. कलहात शिरल्यावर लहानपणाच्या सबबींकडे लक्ष देऊन कोणी कीव करतो, अशातली गोष्ट बिलकूल नाही'. (राजवाडे - कादंबरी निबंध पान ३३)

राजवाड्यांच्या चरित्राचा हा प्रथम भाग लिहिण्यात आमचा हेतू कोणता आहे हे सुरुवातीसच कथन करणे आम्हास युक्त वाटते. राजवाड्यांच्या विचारसंप्रदायाचे स्वरूप कोणत्या प्रकारचे होते, त्यांनी साक्षात् काय कार्य केले, व त्यापासून फलनिष्पत्ती कोणती झाली, इत्यादि गोष्टी त्यांच्या चरित्रकथनात अत्यंत महत्त्वाच्या असून त्यांची स्पष्टता चरित्राचे प्रारंभीच करणे इष्ट वाटल्यावरून हे प्राक्कथन लिहिण्यास आम्ही उद्युक्त झालो आहोत. इ. स. १३०० सालापासून इ. स. १९२६ साली राजवाड्यांचे निधन झाले तोपावेतो महाराष्ट्रात जे अनेक विचारप्रवर्तक नेते झाले व ज्यांनी राष्ट्रोद्धारास्तव ज्या ज्ञान व विचारप्रणाली प्रचलित केल्या त्यात राजवाड्यांचे व त्यांनी प्रतिपादिलेल्या व प्रचलित केलेल्या विचारप्रणालीचे स्थान कोणते व तिचा परिणाम महाराष्ट्राच्या पुनरुत्थापनावर कोणत्या प्रकारचा घडणे संभवनीय आहे याची यथातथ्य कल्पना या ग्रंथाच्या वाचकांस करून देण्यास्तव हे प्राक्कथन आम्ही केले आहे.

इतिहासाचार्य कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांच्या चरित्राचे विहंगम दर्शन घेतले असता त्यांच्या चरित्राचे दोन निरनिराळे भाग दृष्टोत्पत्तीस येतात. त्यांच्या जन्मापासून त्यांच्या कुटुंबाचे इ. स. १८९३ साली निधन झाले, तोपावेतोचा कालविभाग व इ. स. १८९३ पासून इ. स. १९२६ साली त्यांचे निधन झाले तोपावेतोचा कालविभाग. या दोन कालविभागांपैकी पहिल्या कालविभागास ज्ञानसंपादन व ज्ञानसंग्रहकालविभाग व

दुसऱ्यास ज्ञान व विचारप्रसारकालविभाग ही नावे देणे (या दोन्ही विभागात त्यांनी केलेल्या कार्याचे स्वरूपावरून) आम्हास उचित वाटते.

## राजवाडे चरित्राचा ज्ञानसंपादन व ज्ञानसंग्रहकाल विभाग

राजवाड्यांच्या जन्मानंतर सात आठ वर्षांनी ज्ञानसंपादनाचे मुख्य साधन जे शिक्षण ते घेण्यास्तव प्राथमिक शिक्षणसंस्थेत त्यांचा प्रवेश झाला. प्राथमिक शिक्षण पुरे झाल्यावर ते दुय्यम शिक्षण देणाऱ्या संस्थेत जाऊ लागले व तेथील शिक्षण पुरे करून मुंबई विश्वविद्यालयाची प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थेतील शिक्षण घेण्याकरिता तेथे जाऊ लागले. राजवाड्यांच्या 'प्राथमिक, दुय्यम व उच्च शिक्षणसंस्थेतील स्वानुभव' या निबंधात केलेल्या कथनावरून प्राथमिक व दुय्यम शिक्षण घेत असता त्यांनी अन्य विषयांच्या ज्ञानसंपादनार्थ काही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थेत त्यांनी प्रवेश केल्यापासून मुंबई विश्वविद्यालयाची बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण होइपावेतो त्यांनी हे शिक्षण घेण्याकरिता जो काळ घालविला त्यात मात्र त्यांनी परीक्षेकरिता नेमिलेल्या ग्रंथांशिवाय अनेक विषयांवरील अनेक ग्रंथांचे, ज्ञानसंपादनार्थ परिशीलन केले. वर उल्लेखिलेल्या त्यांच्या शिक्षणविषयक निबंधात याविषयीचा त्यांनी साक्षात् उल्लेख केला आहे. कोणकोणत्या विषयांवरील कोणकोणते व किती ग्रंथ राजवाड्यांनी वाचले याचा तपशील त्यांनी दिला नाही. बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर राजवाड्यांनी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये नोकरी धरली व ती १८९३ सालात त्यांनी सोडली. या काळात ज्ञानसंपादनार्थ कोणते व किती ग्रंथ त्यांनी वाचले याविषयीचा उल्लेख त्यांच्या लेखात कोठे आला नाही, तथापि राजवाड्यांना ज्ञानसंपादनार्थ ग्रंथ वाचनाचा फार नाद असल्यामुळे व त्यांच्या मनाच्या स्वाभाविक उत्कटतेमुळे त्यांनी या काळात अनेक ग्रंथ ज्ञानसंपादनार्थ वाचले असावेत असे आमचे अनुमान आहेत. भाषांतर मासिकात निरनिराळ्या विषयांवरील ज्या ग्रंथांची भाषांतरे प्रसिद्ध करण्यात आली आहेत त्या विषयांवरील अनेक ग्रंथ वाचून त्यांतील ज्ञानाचे संपादन त्यांनी केले असे निश्चित अनुमान करण्यास हरकत नाही (या संबंधाची माहिती पुढे आली आहे.) ज्ञानसंपादन व संग्रह या बाबतीत दासबोधांतर्गत श्रवणभक्तीचे जे विवरण समर्थांनी केले आहे त्यास अनुसरून राजवाड्यांनी नाना विषयांवरील ग्रंथ वाचून त्यांतील ज्ञानाचे संपादन व संग्रह केला. श्रवणभक्तीत समर्थांनी त्यांच्या काळी अस्तित्त्वात असलेले ज्ञानाचे विषय नमूद केले आहेत. समर्थांच्या काळानंतर तीनशे साडेतीनशे वर्षांनी जगात अनेक घडामोडी

होऊन पाश्चात्यांचा हिंदुस्थानाशी संबंध जुडल्यामुळे पाश्चात्य देशांतील अनेक नूतन विषयांसंबंधाच्या ज्ञानाची आपल्या देशात अस्तित्त्वात असलेल्या ज्ञानाच्या विषयांत भर पडली आहे. राजवाड्यांनी समर्थांच्या उपदेशाप्रमाणें :-

ऐसें हें अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधून घ्यावें ।।
असार तें जाणोनि त्यागावें । या नांव श्रवणभक्ती ।।

(दासबोध, दशक ४ समास १ ओंवी २९)

आधुनिक काळात उदयास आलेल्या इतिहास, इतिहासशास्त्र, तौलनिक व्युत्पत्तिशास्त्र, पुराणवस्तुसंशोधनशास्त्र, नाण्यांचे शास्त्र, तौलनिक व्याकरणशास्त्र, शब्दध्वनिप्रकियाशास्त्र इत्यादी पाश्चात्य विद्याविषयीच्या अनेक ग्रंथांचे वाचन करून त्यांनी ज्ञानसंपादन केले. याशिवाय वेद, संस्कृत भाषा, पाणिनि व कात्यायन इत्यादिकांची व्याकरणे, धर्मशास्त्र, प्राकृत भाषा व अर्वाचीन भाषा आणि त्यांची व्याकरणे, त्यांचे वाङ्मय इत्यादिकांचा तौलनिक अभ्यास त्यांनी केला. अशा रीतीने त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी जे महत्त्वाचे कार्य केले त्याचा पाया त्यांनी पूर्ववयात घातला.या कारणास्तव त्यांच्या आयुष्याच्या पूर्वार्धास ज्ञानसंपादन व ज्ञानसंग्रह कालविभाग हे नाव आम्ही दिले असून त्यात त्यांच्या जन्मापासून त्यांच्या कुटुंबाच्या निधनापावेतो म्हणजे इ. स. १८९३ सालापावेतोचे त्यांच्या चरित्राचे कथन केले आहे.

## राजवाडे चरित्राचा ज्ञान व विचारप्रसाराचा कालविभाग

कै. राजवाड्यांच्या चरित्राच्या उत्तरार्धाचे ज्ञानप्रसाराचा कालविभाग असे आम्ही नामकरण करतो. या कालविभागात त्यांनी संपादन व संग्रह केलेल्या ज्ञानाचे आधारे नानाविध विषयांवर अनेक लेख लिहून विस्तृत वाङ्मय निर्माण केले व त्याचा प्रसार महाराष्ट्रीय जनतेत केला. इ. स. १८९४ पासून इ. स. १९२६ साली त्यांचे निधन झाले तोपावेतोच्या बत्तीस वर्षांच्या काळात नानाविध विषयांवर मराठी भाषेत वाङ्मय निर्माण करून महाराष्ट्रातील सुशिक्षित तरुणपिढीचे अंत:करणांत व मनोरचनेत विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी जी विचारक्रांती घडवून आणिली होती तिची जोपासना करून महाराष्ट्राच्या उद्धाराच्या खऱ्या मार्गाचे दिग्दर्शन त्यांनी करून दिले. राजवाड्यांच्या आयुष्याच्या या कालविभागात त्यांनी केलेल्या कार्याच्या स्वरुपावरून इतिहाससंशोधक म्हणून त्यांची ख्याती झाली. राजवाड्यांचे बाबतीत जी महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवणे अगत्याचे आहे ती ही की, इतिहाससंशोधन हे राजवाड्यांचे अंतिम ध्येय नव्हते. त्यांच्या अंतिम ध्येयाचे

हे एक साधन होते. राजवाड्यांपूर्वी महाराष्ट्रात डॉक्टर भाऊ दाजी लाड, भगवानलाल इंद्राजी, डॉक्टर भांडारकर, वि. ना. मंडलिक इत्यादि विद्वान् पुराणवस्तू व पुराणेतिहास संशोधक म्हणून प्रसिद्धीस आले होते. या सर्वांनी इतिहाससंशोधन हेच त्यांचे अंतिम ध्येय म्हणून संशोधनात्मक कार्य केले व आपले सर्व आयुष्य या कार्याला वाहून घेतले. राजवाड्यांची गोष्ट मात्र या विद्वान् संशोधकांहून अगदी भिन्न होती. महाराष्ट्राचे स्वातंत्र्य नष्ट होऊन या देशावर परकीय पाश्चात्य देशांतील इंग्रजांची राजकीय सत्ता प्रस्थापित झाली हा चमत्कार कोणत्या कारणामुळे घडून आला याचे साग्र व तपशीलवार चित्र महाराष्ट्रीय जनतेपुढे मांडून नष्ट झालेले स्वातंत्र्य कोणत्या मार्गाने निश्चितपणे महाराष्ट्रातील लोकास मिळू शकेल याची यथायोग्य कल्पना महाराष्ट्रातील जनतेत निर्माण करून महाराष्ट्रातील तरुण पिढीस त्या मार्गाचे आक्रमण करण्यास उद्युक्त करणे, हे राजवाड्यांचे इतिहाससंशोधन, इतिहाससंशोधनादी संस्थांची स्थापना इत्यादी त्यांनी केलेल्या खटाटोपाचे अंतिम ध्येय होते व या ध्येयाचे सिद्धीस्तव त्यांनी त्यांच्या आयुष्याचा दुसरा कालविभाग व्यतीत केला. राजवाड्यांनी त्यांच्या आयुष्याच्या पहिल्या कालविभागात केलेल्या ज्ञानसंपादन व ज्ञानसंग्रहाचे अंती महाराष्ट्रदेशाच्या दास्यविमोचनाच्या व उद्धाराच्या मार्गाविषयीचे विचार भाषांतर मासिक पुस्तकात ते एक वर्ष चालविल्यावर त्यांनी लिहिलेल्या एका लेखात प्रगट केले आहेत, त्यावरून दिसून येते. स्वदेशाचे दास्यविमोचन व उद्धार या विषयीच्या युक्तमार्गासंबंधींचे विचार राजवाड्यांचे मनात सतत घोळत असत. हे कार्य घडवून आणण्याकरिता इ. स. १८८५ सालीं राष्ट्रीय सभेची स्थापना देशात झाली होती, व तिच्याद्वारे राजकीय हालचाली देशात साक्षात् सुरू होत्या. राजवाड्यांच्या अंत:करणात तीव्र देशाभिमान वसत होता. परकीय सत्तेचा व ती चालविणाऱ्या लोकांचा तीव्र द्वेष करणारा त्यांच्यासारखा दुसरा कोणी आढळणे दुर्घट होते. राजवाड्यांना इष्ट व प्रिय वाटणारी गोष्ट साक्षात् घडवून आणण्याकरिता देशात एक संस्था स्थापन केली गेली असूनही तीत राजवाडे सामील झाले नाहीत, अगर त्या संस्थेने चालविलेल्या हालचालीत बिलकूल भाग घेतला नाही. नाहीं म्हणावयास त्यांच्या ठिकाणच्या जाज्वल्य देशाभिमानाचे योगाने सातारा येथे इ. स. १९०० साली जी मुंबई इलाख्याची राजकीय परिषद भरली होती व जीत राजवाडे उपस्थित होते तीत सातारा जिल्ह्यात राजकीय प्रचार करण्याकरिता दोन गृहस्थांची नेमणूक करण्याचा ठराव परिषदेपुढे मांडण्यात आला होता, त्यावर त्यांनी भाषण केले. ठरावात ज्या दोन गृहस्थांची नावे दाखल करण्यात आली होती त्यांत राजवाड्यांचे एक

नाव होते. या ठरावानंतर राजवाड्यांनी त्याअन्वये राजकीय चळवळीचे प्रत्यक्ष कार्य काहीएक केले नाही. जे काही कार्य केले ते विचारनिर्मितीचे व प्रसारकाचे केले. या आम्ही केलेल्या विधानात विचार हा जो शब्द आम्ही योजला आहे त्याची प्रस्तुत स्थळी अधिक स्पष्टता करणे अवश्य आहे.

कोणत्याही सुसंस्कृत देशांतील मानवी समाजावर परिणाम करणारे महत्त्वाचे दोन प्रकारचे विचार अस्तित्वात असल्याचे आढळून येते. एक अध्यात्मज्ञानविषयक विचार, व दुसरा आधिभौतिक ज्ञानविषयक विचार. या दोन ज्ञानविचारांच्या स्वरूपाची किंचित स्पष्टता प्रस्तुत स्थळी करणे अवश्य आहे. या दृश्य जडसृष्टीचा निर्मिता कोण, तिच्या अंतर्गत काही अजड सूक्ष्म तत्त्व आहे की कसे, या जगात जन्मास येणाऱ्या मानवी प्राण्याचा देह निव्वळ जड स्वरूपी आहे किंवा त्याच्या अंतर्गत काही सूक्ष्म अजड तत्त्व आहे, जड सृष्टीच्या व जड मानवी देहाच्या अंतर्गत काही सूक्ष्म अजड तत्त्व असल्यास त्याचा काही परस्पर संबंध आहे की कसे, मृत्यूनंतर मानवी प्राण्याची गती काय होते व या गतीच्या दृष्टीने जगात मानवी प्राणी अस्तित्वात आहे तोपावेतो त्याने विशिष्ट प्रकारचे आचरण करण्याची आवश्यकता आहे की कसे, इत्यादी प्रश्नांविषयीच्या ज्ञानाचा समावेश अध्यात्मज्ञानविचारात होतो. या ज्ञानाचे अंतिम फल पारलौकिक असते. भरतखंडातील हिंदूधर्मानुयायी लोक या पारलौकिक फलास मोक्ष-जन्ममरणाचे फेऱ्यातून मुक्तता या नावाने ओळखतात. हे फल मिळविण्याची साधने ज्ञान, कर्म व भक्ती, ही आहेत, असे हिंदूधर्मानुयायी मानतो व जसे ज्यास परवडेल त्याप्रमाणे तो या मार्गांपैकी कोणत्यातरी एका मार्गाने आचरण करीत असतो. या ज्ञानविचारांत मानवी प्राण्यास वैयक्तिक मोक्षप्राप्ती होणे संभवते, परंतु अनेक मानवी प्राण्यांचा गट अगर राष्ट्र यांस या ज्ञानविचाराचे मोक्ष हे जे अंतिम फल ते मिळणे संभवत नाही. याचे कारण उघडच हे आहे की, राष्ट्रांतर्गत सर्व मानवी प्राण्यांस मोक्षप्राप्तीस्तव जे आचरण करणे अवश्य असते, त्याप्रमाणे ते आचरण करतीलच, ही गोष्ट संभवत नाही. आता भौतिकज्ञानविचार म्हणजे काय याचे थोडक्यात दिग्दर्शन करतो. या दृश्य जड सृष्टीत जितके काही जड पदार्थ आहेत त्यांच्या गुणधर्माचे संशोधन व पृथक्करण करून त्या विषयीचे मानवी प्राण्यास प्राप्त होणारे ज्ञान हेच भौतिकज्ञान होय. या ज्ञानाचे फल मानवी समाजातील प्रत्येक व्यक्तीचा, त्याचप्रमाणे अनेक मानवी प्राण्यांच्या गटांचा-राष्ट्रांचा-प्रपंच सुखदायी होणे हे आहे. या ज्ञानविचारांची साधने प्रस्तुत भौतिक ज्ञानविचारांच्या शिखरावर अधिष्ठित असलेल्या पाश्चात्य राष्ट्रांत विद्यमान असलेली रसायनशास्त्र, यंत्रशास्त्र, भूगर्भशास्त्र, खगोलशास्त्र, विमानशास्त्र, युद्धशास्त्र इत्यादी

होत. राष्ट्रीय प्रपंचदृष्ट्या या ज्ञानविचारांचे श्रेष्ठ फल म्हणजे संपूर्ण स्वातंत्र्ययुक्त स्वराज्य हे आहे.

या दोन प्रकारच्या विचारांपैकी राजवाडे कोणत्या प्रकारच्या विचाराचे भोक्ते व प्रवर्तक होते याचे दिग्दर्शन त्यांच्या चरित्राचे अंतरंग व रहस्य वाचकांचे लक्षात येण्यास्तव आम्ही यापुढे केले आहे. राजवाड्यांच्या विचारसंप्रदायाचे वैशिष्ट्य व महत्त्व लक्षात येण्यास्तव महाराष्ट्रदेशातील लोकांचे मनावर परिणाम करणारे कोणते विचारसंप्रदाय राजवाड्यांच्या पूर्वी अस्तित्वात होते व त्याचे परिणाम महाराष्ट्राच्या धार्मिक व राजकीय जीवनावर कोणत्या प्रकारचे घडून आले होते याचे स्थूल दिग्दर्शन आम्ही प्रथम करतो.

महाराष्ट्राच्या राजकीय चरित्रावर परिणाम करणारी पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे देवगिरीच्या यादव राजराण्यातील रामदेवराव यादवावर अल्लाउद्दीन खिलजीने इ. सनाच्या तेराव्या शतकाच्या अखेरीस केलेली स्वारी आणि त्यानंतर थोडक्याच काळात झालेला त्याच्या राजकीय सत्तेचा विध्वंस व मुसलमानांच्या राजकीय सत्तेची महाराष्ट्रात स्थापना ही होय. कोणत्याही राष्ट्रांतील मानवी समाजाच्या आर्थिक, सामाजिक व धार्मिक जीवनावर राजकीय सत्तेच्या उलथापालथीमुळे भयंकर परिणाम घडतात. देवगिरीच्या यादवांची महाराष्ट्रातील राजकीय सत्ता नष्ट होऊन मुसलमानी राजकीय सत्तेची स्थापना झाल्यावर महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीवर थोडाफार परिणाम झाला. यादवांच्या राजवटीत महाराष्ट्रात नांदत असलेल्या श्रेष्ठ दर्जाच्या सुबत्तेस ओहोटी लागली. परदेशी मुसलमान अधिकाऱ्यांकडून प्रजेची पिळवणूक होऊ लागली. मुसलमानी सत्तेचा आर्थिक स्थितीपेक्षा धार्मिक स्थितीवर फार भयंकर व अनिष्ट परिणाम झाला. हजारो देवालये व त्यातील मूर्ती भग्न पावल्या. महाराष्ट्रातील समाजाच्या सामाजिक जीवनाशीं धर्माचा निकट संबंध असल्यामुळे मुसलमानी राजकीय सत्तेचा धार्मिक स्थितीप्रमाणेच सामाजिक स्थितीवरही भयंकर परिणाम झाला. हिंदूंच्या आचारधर्मास मुसलमानी धर्म अत्यंत विरोधी असल्यामुळे हिंदूंचा आचारधर्म नष्ट होऊन लयास गेला !

वर दर्शविलेल्या परिस्थितीत महाराष्ट्रीय समाजाच्या नेत्यांचे लक्ष आपल्या धर्माचे रक्षण कोणत्या मार्गाने करावयाचे याच्या चिंतनाकडे सर्वस्वी वेधले गेले. ज्ञानेश्वरांपासून छत्रपती शिवाजीमहाराज व समर्थ रामदासस्वामी महाराष्ट्रात अवतीर्ण होततोपर्यंत म्हणजे इ. स. १३०० पासून इ. स. १६५० पावेतो महाराष्ट्रीय समाजाच्या नेत्यांनी अध्यात्म ज्ञानांतर्गत भक्तिमार्गाच्या ज्ञानाचा पुरस्कार व प्रसार महाराष्ट्रीय जनतेत करण्याकडे आपले शक्तिसर्वस्व खर्च केल्याचे, साडेतीनशे वर्षांच्या दीर्घ काळात निर्माण झालेल्या मराठी

भाषेतील विस्तृत वाङ्मयावरून दिसून येते. पंढरपूरच्या श्रीविठ्ठलाची भक्ती , विठ्ठलाचे नामस्मरण व नामसंकीर्तन या एकाच विषयासंबंधीच्या ज्ञानाची आवड महाराष्ट्रीय जनतेत महाराष्ट्रीय संतांनी निर्माण करून तिला मुसलमानी धर्म स्वीकारण्यापासून परावृत्त केले. या काळात भौतिक ज्ञानात भर टाकण्याचे प्रयत्न महाराष्ट्रीय समाजातील कोणत्याही विचारी नेत्याने केल्याचे एकही उदाहरण दृष्टोत्पत्तीस पडत नाही.

महाराष्ट्रीय संतांनी निर्मिलेल्या व प्रसृत केलेल्या या विचारप्रणालीचा इष्ट व महत्त्वाचा एकच परिणाम महाराष्ट्रीय समाजात घडून आला. तो म्हटला म्हणजे महाराष्ट्रीय समाजाच्या धर्माचे रक्षण झाले. हे कार्य या विचारप्रणालीने फार मोठे घडून आले यात संशय नाही. प्रस्तुत स्थळी महाराष्ट्रातील या विचारप्रणालीवरील लक्ष काढून याच काळात इंग्लंड देशात अस्तित्वात असलेल्या विचारप्रणालीकडे लक्ष देणे व त्या देशात काय प्रकार घडत होता याचे विहंगम दर्शन घेणे युक्त आहे.

महाराष्ट्रावर राजकीय सत्ता स्थापन करणाऱ्या इंग्रजांच्या इंग्लंड देशांत कोणत्या प्रकारची विचारक्रांती या काळी अस्तित्वात येत होती व हिंदुस्थानात इंग्रजांचा प्रवेश होण्यापूर्वी आध्यात्मिक शास्त्रज्ञान व भौतिक शास्त्रज्ञान यांपैकी कोणत्या ज्ञानाची महती त्यांना वाटत होती व या दोन ज्ञानविचारांपैकी त्यांचे मनावर कोणत्या ज्ञानाची अधिक पकड बसली होती याचे प्रस्तुत स्थळी दिग्दर्शन करणे अवश्य आहे. इंग्लंडमध्ये बेकन हा भौतिक शास्त्रीय ज्ञानाच्या महतीचा प्रवर्तक इ. स. १५६१ सालात जन्मास आला व इ.स. १६२६ सालांत त्याचें निधन झाले. त्याच्या हयातीत त्याने *Advancement of Learning* व *Novum orgavum* या नावाचे दोन महत्त्वाचे ग्रंथ लिहून प्रसिद्ध केले. एणेकरून एका नूतन भौतिक शास्त्रीय ज्ञानांतर्गत शाखेचे त्याने प्रवर्तन केले व इंग्रजांच्या ज्ञानात त्याने क्रांती घडवून आणिली.

बेकनचा इंग्लंडांत उदय होण्यापूर्वी त्या देशातील नेते कोणत्या ज्ञानाचे भोक्ते होते व त्याचे स्वरूप कोणत्या प्रकारचे होते, बेकनने अस्तित्वात असलेल्या ज्ञानात कोणत्या प्रकारची क्रांती घडवून आणिली व त्या क्रांतीचे परिणाम इंग्रज लोकांचे मनावर कोणत्या प्रकारचे घडले इत्यादी मुद्द्यांचे उत्कृष्ट प्रकारचे दिग्दर्शन मेकॉलेने बेकनच्या चरित्राच्या परीक्षणात्मक निबंधात केले आहे. आता दर्शविलेल्या ज्या मुद्द्यांचे आम्ही विवेचन करीत आहोत त्यांचे रहस्य वाचकांचे लक्षात येण्यास्तव व राजवाडेनिर्मित विचारसंप्रदायाचे महत्त्व लक्षात येण्यास्तव मेकॉलेने केलेल्या या चर्चेचा एक महत्त्वाचा उतारा प्रस्तुत स्थळी आम्ही उद्धृत करतो.

At length time arrived when the barren philosophy which had during so many ages, employed the faculties of the ablest of men was destined to fall. Words and more words had been all the toil of all the most renowned ages of sixty generations. But the days of this sterile exuberence were numbered. Many causes predisposed the public mind to a change. The study of a great variety of ancient writers, though it did not give a right direction to Philosophical Research did much towards destroying that blind reverence for authority which had prevailed when Aristole ruled alone ........... Thus before the birth of Bacon the Empire of Scholastic Philosophy had been shaken to its foundations. There was in the intellectual world an anarchy resembling that which in the political world often follows the overthrow of an old and deeply rooted Government. Antiquity, prescription, the sound of great names had ceased to awe mankind. The dynasty which had reigned for ages was at an end and the vacant throne was left to be struggled for by pretenders.

That leader at length arose. The Philosophy which he taught was essentially new. It differed from that of the celebrated ancient teachers, not merely in method but also in its object. Its object was the good of mankind, in the sense in which the mass of mankind always have understood the word good.

To sum up the whole, we should say that the aim of Platonic philosophy was to exalt man into a god. The aim of the Baconian Philosophy was to provide man with what he requires while he continues to be a man. The aim of Platonic Philosophy was to raise us far above vulgar wants. The aim of the Baconian Philosophy was to supply our vulgar wants. The former aim was noble, but the latter was attainable. Plato drew a good bow, but like Acestas in Virgil, he aimed at the stars, and therefore, though there was no want of strength or skill the shot was thrown away. His arrow was indeed followed by a track of dazzling radiance, but it struck nothing... Bacon fixed his eyes on a mark which was placed on the earth and within bow shot and hit it is

the whole. The Philosophy of Plato began in words and ended in words, noble words indeed, words such as were to be expected from the finest of human intellect exercising boundless dominion over the inest of human languages. The Philosophy of Bacon began in observation and ended in arts ........ They (ancient philosophers) promised what was impracticable, they despised what was practicable; they filled the world with long words and long beards, and they left it as wicked and as ignorant as they found it.

What was then the end which Bacon proposed to himself ? It was to use his own emphatic expression "fruit". It was the multiplying of human enjoyments and the mitigating of human sufferings. It was the "relief of man's estate". This was the object of all his speculations in legislation, in politics, in morals. These words form the Key of Baconian Doctrine Utility and progress.

What Bacon did for inductive Philosophy, may, we think be fairly stated thus. The objects which could only be attained without careful induction. Those speculators therefore did not perform the inductive Proces carefully. Bacon stirred up men to pursue an object which could only be attained by induction and induction carefully performed and consequently induction was carefully performed. It was not by furnishing philosophere with rules for performing the inductive Process well but by furnishing them with a motive for performing it well, that he conferred so vast a benefit on society.

Some people may think the object of Baconian Philosophy a low object but they cannot deny that high or low, it has an aim. They cannot deny that mankind have made and are making great and constant progress in the road which he (Bacon) pointed out to them. Was there any such progressive movement amongst the ancient philosophies ? After they had been declaiming eight hundred years had they made the world better than when they began ?

या उताऱ्यात दर्शविल्याप्रमाणे हिंदुस्थानात प्रवेश करणाऱ्या इंग्रजांत भौतिक ज्ञान संपादन करण्याची लालसा व तिचे महत्त्व त्यांस पूर्णपणे पटून भौतिक ज्ञानाचे ते उपासक बनले होते. इंग्लंड देशाची हवा, पाणी, देशाचा आकुंचितपणा, देशातील जमिनीचा नापीकपणा व त्यामुळे उत्पन्न होणारी मानवी जीवनोपयोगी पदार्थांची दुर्मिळता इत्यादी गोष्टींमुळे अध्यात्मज्ञानाकडे इंग्रजांच्या मनाचा नैसर्गिक ओढा कधीच नव्हता. बेकनसारखा भौतिक ज्ञानाचा नूतन पुरस्कर्ता निर्माण होऊन बुभुक्षित व खडतर आयुष्य कंठणाऱ्या इंग्रज जनतेस त्याने या नूतन ज्ञानाचा संदेश देताच तो त्यास पूर्णपणे पटला व भौतिक शास्त्रज्ञानामुळे प्राप्त होणाऱ्या सुखोपयोगी ऐहिक जीवनाची भविष्यकाळची सुखस्वप्ने इंग्लंडांतील जनतेच्या विचारी नेत्यांस पटू लागली. याच सुमारास एक दैवी घटना इंग्लंडच्या राष्ट्रीय चरित्रांत घडून आली. ही घटना म्हणजे इ. स. १५९९ च्या सप्टेंबर महिन्याच्या २४ तारखेस ईस्ट इंडिया कंपनीची इंग्लंडात झालेली स्थापना ही होय. ही कंपनी कोणत्या परिस्थितीत स्थापन केली गेली व पाश्चात्य इंग्रजी राष्ट्राचा हिंदुस्थानाशी संबंध कसा अस्तित्वात आला  याविषयींच्या एका अधिकारी व विचारी इंग्रज विद्वानाचा अभिप्राय खालीं दिला आहे. 'आमच्या राष्ट्राची अब्रू वाढावी, लोकांस संपत्ती मिळावी, जहाजांची शक्ती वृद्धिंगत व्हावी, म्हणजे एकंदरीत फायदेशीर व्यापार वाढून आमच्या देशाची भरभराट व्हावी' हा या कंपनीच्या स्थापनेचा हेतू ठरविण्यात आला.

No one would deny the far reaching charector of the effect upon India of her contact with the West. Yet the establishment of the Europeons in India was a curiously half hazard affair. The British for example did not originally come to India in pursuance of plans of Empire, nor had the East India Company in 1641 it set up its first trading station in India, any thought of interfearance with the internal affairs of the country. The diffident spirit which inspired these early visitors of the West to India, is well illustrated by the tone of the letter of John Russel, the president of the East India Company. In 1715 after waiting for two years at the Emperors court and Embadey sent under John Surman obtained the right of free trading in Bengal. (The story of Indian civilisation by C.E.M. Joad page 27, 28)

या हेतूस अनुसरून दिल्लीच्या मोंगल बादशाहांकडून हिंदुस्थानात व्यापार करण्याकरिता इंग्रजांच्या वखारी घालण्याची परवानगी इंग्रजांनी मिळविली व महाराष्ट्र

प्रांतास लागून असलेल्या गुजराथ प्रांतातील सुरत शहरी इंग्रजांच्या व्यापारी वखारीची स्थापना इ. स. १६१३ सालात झाली. इंग्लंड देशातील या घटनेप्रमाणेच बेकनने प्रचलित केलेल्या भौतिक ज्ञानविचारांतर्गत नवीन शाखेइतक्याच अत्यंत महत्त्वाच्या व परिणामकारी एका नूतन घटनेचा प्रस्तुत स्थळी आम्ही उल्लेख करतो. ही घटना म्हणजे इ. स. १६६० सालात रॉयल सोसायटीची इंग्लंडात झालेली स्थापना ही होय. गेल्या तीनशे चारशे वर्षांत इंग्लंड देशास जे वैभव, सुबत्ता व पृथ्वीचे पाठीवरील फार मोठ्या प्रदेशावर विस्तृत साम्राज्य प्राप्त झाले त्याचे मूळ कारण ही संस्था आहे. मेकालेच्या इंग्लंड देशाच्या इतिहासात या संस्थेच्या प्रभावाच्या वर्णनात्मक भागांतील एक महत्त्वाचा उतारा प्रस्तुत स्थळीं आम्ही देतो.

It is remarkable fact that, while the lighter literature of England was thus becoming a nuisance and a national disgrace the English genius was effecting in science a revolution which will, to the end of time, be reckoned among the highest achievements of the human intellect. Bacon had sown the good seed in a sluggish soil and an ungenial season. He had not expected an early crop, and in his last testament had solemnly bequeathed his fame to the next age. During a whole generation his philosophy had, amidst tumults, wars, and proscriptions, been slowly ripening in a few well constituted minds. While factions were struggling for dominion over each other, a small body of sages had turned away with benevolent disdain from the conflict, and had devoted themselves to the nobler work of extending the dominion of man over matter. As soon as tranquillity was restored, these teachers easily found attentive audience. For the discipline through which the nation had passed had brought the public mind to a temper well fitted for the reception of the Verulamian doctrine. The civil troubles had stimulated the faculties of the educated classes, and had called forth a restless activity and an inasatiable curiosity, such as had not before been known among us. Yet the effect of those troubles was that schemes of political and religious reform were generally regarded with suspicion and contempt. During twenty years the chief employment of busy and ingenious men had been to frame constitutions with

first magistrates, without first magistrates, with hereditary senates, with senates appointed by lot, with annual senates, with perpetual senates".

The year 1660, the era of the restoration of the old constitution, is also the era from which dates the ascendency of the new philosophy. In that year the Royal Society, destined to be a chief agent in a long series of glorious and salutary reforms, began to exist. In a few months experimental science became all the mode. The transfusion of blood, the ponderation of air, the fixation of mercry, succeeded to that place in the public mind which had been lately occupied by the controversies of Rota. Dreams of perfect forms of Government made way for dreams of wings with which men were to fly from the Tower to the Abbey, and of doublekeeled ships which were never to founder in the fiercest strom. All classes were hurried along by the prevailing sentiment. Cavalier and Roundhead, Churchman and Puritan, were for once allied. Divines, jurists, statesmen, nobles, princes, swelled the triumph of the Baconian philosophy. Poets sang with emulous fervour the approach of the golden age. Cowley, in lines weighty with thought and resplendent with wit, urged the chosen seed to take possession of the promised land flowing with milk and honey, that land which their great deliverer and lawgiver had seen, as from the summit of Pisgah, but had not been permitted to enter.

Both chief Justice Hale and Lord Keeper Guildford stole some hours from the business of their courts to write on hydrostatics. Indeed it was under the immediate direction of Guildford that the first barometers ever exposed to sale in London were constructed. Chemistry divided, for a time, with wine and love, with the stage and the gaming table, with the intrigues of courtier and the intrigues of demagogue, the attention of the fickle Buckingham. Rupert has the credit of having invented mezzotinto; and from him is named that curious bubble of glass which has long amused children and puzzled philosophers. Charles himself had a laboratory at Whithall, and was for more

active and attentive there than at the council board. It was almost necessary to the character of a fine gentleman to have something to say about airpumps and telescopes; and even fine ladies, now and then, thought it becoming to affect a taste for science, went in coaches and six to visit the Gresham curiosities, and broke forth into cries of delight at finding that a magnet really attracted a needle, and that a microscope really made a fly look as large as a sparrow.

( The History of England by Lord Macaulay
and by T. F. Henderson Vol. I page 355 - 356 )

आतापावेतो दर्शविलेल्या परिस्थितीत भौतिक ज्ञानाने सज्ज झालेल्या व स्वत:च्या राष्ट्राचा प्रपंच पूर्ण सुखदायी करण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या इंग्रजांनी मुख्यत्वेकरून भरतखंडाशी व्यापार करण्याच्या ध्येयास्तव महाराष्ट्रदेशात इसवी सनाच्या सोळाव्या शतकांत प्रवेश केला. त्या काळी महाराष्ट्रात कोणत्या प्रकारची राजकीय घटना अस्तित्वात येत होती व त्या काळची महाराष्ट्रीयांची मनोरचना कशा प्रकारची होती, ते अध्यात्मज्ञानविचाराचे भोक्ते होते की भौतिक ज्ञानविचाराचे भोक्ते होते याचे दिग्दर्शन करणे अवश्य आहे.

यादव घराण्याची राजकीय सत्ता नष्ट झाल्यावर साडेतीनशे वर्षांनी वर नमूद केलेल्या इंग्लंड देशात घडून आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेच्या व्यापारी घटनेइतकीच महाराष्ट्राच्या राजकीय जीवनावर परिणाम करणारी दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे इ. स. १६३० चे सुमारास छत्रपती श्रीशिवाजी महाराज व श्रीसमर्थ रामदासस्वामी या दोन महापुरुषांचा महाराष्ट्रांत झालेला उदय ही होय. या दोन घटना म्हणजे महाराष्ट्रभूचे उदरी भावी काळात उदयास आलेल्या मराठा व इंग्रज राष्ट्रांच्या गर्भस्थापनेच्या स्वरूपाच्या होत्या. या दोन गर्भांपैकी मराठा राष्ट्राचा गर्भ फार झपाट्याने वाढीस लागून छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाने मराठीराष्ट्र अथवा मराठ्यांचे स्वराज्य प्रगट होऊन भरतखंडातील निरनिराळ्या राजसत्ता धारण करणारांत छत्रपती स्थापित स्वराज्य हे एक स्वतंत्र राज्य अथवा राष्ट्र म्हणून मान्यता पावले. महाराष्ट्रभूचे उदरी स्थापित झालेल्या इंग्रज राष्ट्राचा गर्भ संथपणे वाढीस लागून दीडशे वर्षांनंतर इ. स. १७५७ सालात प्लासीची लढाई झाली त्या साली इंग्रजी राज्य अथवा राष्ट्र म्हणून प्रगट होऊन भरतखंडातील निरनिराळ्या राजकीय सत्ताधाऱ्यांत ते समाविष्ट झाले. इ.स. १७५७ पासून इ.स. १८१८

सालापावेतोच्या साठएकसष्ट वर्षांच्या काळात भरतखंडातील या राष्ट्राचे प्रतिस्पर्धी जे मराठाराष्ट्र अथवा राज्य त्यास नामोहरम करून त्याचे स्थान या राज्याने प्राप्त करून घेतले. याप्रमाणे इंग्लंडात व महाराष्ट्रात भौतिक ज्ञानसंवर्धन, व्यापार व राजकारण यासंबंधी घटना व स्थित्यंतरे घडून येत असता महाराष्ट्रातील आध्यात्मिक व आधिभौतिक ज्ञानविषयांचे बाबतीत कोणती परिस्थिती अस्तित्वात होती व मराठ्यांचे स्वराज्य अस्तित्वात येण्यास आध्यात्मिक ज्ञानविचार व भौतिक ज्ञानविचारांपैकी कोणता ज्ञानविचार प्रामुख्याने कारणीभूत झाला याचे आम्ही दिग्दर्शन करतो.

छत्रपती शिवाजी व समर्थ रामदास उदयास येण्याचे सुमारास त्यांच्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या आध्यात्मिक ज्ञानात व नूतन अवतीर्ण झालेल्या क्रांतीच्या काळात अस्तित्वात आलेल्या आध्यात्मिक ज्ञानात कोणता भेद होता हे आम्ही स्पष्ट करतो. एक महत्त्वाची बाब लक्षात ठेवावयाची ती ही की, मराठी राज्याची स्थापना इ. स. १६४६ सालात होण्यास प्रारंभ झाल्यापासून इ. स. १८१८ सालात त्या राज्याचा अंत होईपर्यंतचा जो एकशे बहात्तर वर्षांचा काळ गेला त्यात भौतिक ज्ञानाच्या संपादनाकडे व जोपासनेकडे महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांचे व विचारप्रवर्तकांचे बिलकूल लक्ष गेले नाही. मुसलमान मोंगल बादशहांची सत्ता नष्ट करून स्वराज्याची स्थापना शिवाजी महाराजांनी भौतिक शास्त्रज्ञानाचे जोरावर व त्याच्या साहाय्याने केली नाही. प्रस्तुत स्थळी या काळातील महाराष्ट्राचे छत्रपती शिवाजीमहाराज व श्रीसमर्थ रामदास हे जे दोन प्रमुख नेते ते कोणत्या ज्ञानाचे भोक्ते होते व स्वराज्याची स्थापना त्यांनी ज्या साधनांनी केली ती साधने आध्यात्मिक ज्ञानात अंतर्भूत होणारी होती की अन्य स्वरूपाची होती इत्यादी प्रश्नांची चर्चा करणे युक्त आहे.

शिवाजीमहाराजांविषयी विचार प्रथम करू. शिवाजीमहाराज हे अध्यात्म ज्ञानाचे भोक्ते होते. स्वराज्यस्थापनेचे महत्कार्य साध्य होण्यास परमेश्वरीकृपा, साधुसंतांचे आशीर्वाद व दैवी उपाय यांची आवश्यकता आहे अशी त्यांची मनोरचना असून, या साधनांनीच आपले ध्येय सिद्ध होणार आहे असा त्यांचा दृढ विश्वास होता. सूर्योपासना करणारे गोपाळभट बिन श्रीधरभट महाबळेश्वरकर यांस इ. स. १६५२ सालात त्यांनी दिलेल्या सनदेवरून, त्याचप्रमाणे चाकणच्या सिद्धेश्वरभट बिन मेघनाथभट ब्रह्मे यांस ता. १७ ऑगष्ट इ. स. १६५३ सालात दिलेल्या सनदेवरून शिवाजीमहाराज अध्यात्मज्ञानाचे भोक्ते होते ही गोष्ट स्पष्टपणे दिसून येते. चाफळ येथील श्रीरामास वार्षिक देणगी काय

कारणास्तव द्यावयाची याचा खुलासा तत्कालीन एका पत्रात आला आहे. त्यावरूनही त्यांच्या मनोरचनेचे स्वरूप आता नमूद केल्याप्रमाणेच असल्याचे दिसून येते. शके १५९९ (इ. स. १६७७) त दत्ताजी त्रिमल यांनी दिवाकर गोसावी यांस लिहिलेल्या पत्रांत 'श्रीदेवाचा समारंभ उत्तरोत्तर वृद्धीते पावावा, तसेच राज्यही उत्तरोत्तर अभिवृद्धीते पावेल' असा शिवाजी महाराजांचा दृढ विश्वास असल्याचे नमूद आहे.

(रामदास रामदासी पान ४३ भा. ९) शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेच्या सिद्धीस्तव आता दर्शविलेल्या या दैवी उपायांप्रमाणे भौतिक साधनांचाही फार मोठ्या प्रमाणात उपयोग केला. या भौतिक साधनांचे दिग्दर्शन किंचित करतो. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेचे व संरक्षणाचे प्रमुख परिणामकारी साधन महाराष्ट्रातील निसर्गदत्त डोंगरी किल्ले हे होय. 'संपूर्ण स्वराज्याचे सार ते दुर्ग' हे शिवाजीच्या राजनीतीचे सूत्र होते. या भौतिक स्वरूपाच्या प्रभावी साधनाशिवाय शिवाजीचे दुसरे प्रभावी साधन म्हणजे विजेसारख्या हालचाली करणारे घोडदळ हे होते. शिवाजीचे राजकीय प्रतिस्पर्धी जे विजापूरचे आदिलशाही मुसलमान, दिल्लीचे मोंगल मुसलमान यांच्या सैन्यांशी लढून त्यांना पराभूत करण्याची करामत शिवाजीने आपल्या घोडदळाच्या साह्याने केली. या दोन कारणांशिवाय शिवाजीची कूटयुद्धपद्धती हे त्याच्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय संपादन करण्याचे तिसरे प्रभावशाली साधन शिवाजीने उपयोगात आणिले. याशिवाय प्रतिस्पर्धी राजसत्ताधाऱ्यांत फूट पाडणे, त्यांच्या मोठमोठ्या सरदारांस लाच देऊन त्यांना अनुकूल करून घेणे इत्यादी अनेक राजकारणी हिकमती त्याने केल्या; परंतु स्वराज्य स्थापनेप्रीत्यर्थ प्रतिस्पर्धी शत्रूंशी होणाऱ्या युद्धांत प्रभावी ठरणारी पाश्चात्यांची हत्यारे म्हणजे बंदुकी, तोफा, दारूगोळा यांचा म्हणण्यासारखा उपयोग शिवाजी करू शकला नाही. कारण ही साधने तयार करण्याचे ज्ञानच महाराष्ट्रीयास अवगत नव्हते. बंदुकी, तोफा, दारूगोळा तयार करण्यास लागणाऱ्या बुद्धिमान लोकांची वाण महाराष्ट्रात होती असे नाही, परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की, पाश्चात्त्य राष्ट्रांनी शोधून काढलेल्या प्रभावी शस्त्रास्त्रांवर हिंदुस्थानदेशाचे भवितव्य सर्वस्वी अवलंबून असून भौतिकशास्त्रविषयक ज्ञानाचा संग्रह व जोपासना करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे ही गोष्ट त्याच्यासारख्या कुशाग्रबुद्धीच्या महापुरुषाच्या लक्षात आली नाही. याविषयी नवल वाटण्याचे काही कारण नाही. शिवाजी उदयास येण्यापूर्वी दीडदोन हजार वर्षे अध्यात्मज्ञान हेच खरे ज्ञान व मानवी प्राण्यांच्या जीवितांचे ज्ञान प्राप्त करून घेणे हेच श्रेष्ठ प्रतीचे कर्तव्य हा सिद्धांत भारतीय समाजाच्या

अनेक विचारी व श्रेष्ठ चारित्र्याचे नेते प्रतिपादित आले होते व भरतखंडातील सर्व जनतेस हा सिद्धांत पूर्णपणे पटून मान्य झाला होता. असे स्थितीत भौतिक शास्त्रीय ज्ञान व त्याची उपयुक्तता आणि महत्त्व शिवाजीस भासू नये यात नवल मानण्यासारखे काही नाही. ज्या भारतसुवर्णभूमध्ये वर्षाऋतूत पुरेसा पर्जन्य पडला म्हणजे करडो खंडी धान्य व अन्य मानवी जीवनोपयोगी पदार्थ निर्माण होऊन या देशातील कोट्यवधी मानवी प्राण्यांचे अल्प श्रमाने जीवन व पोषण उत्तम प्रकारे होऊ शकते त्या देशातील समाजाच्या बुद्धिमान व विचारी नेत्यांनी भौतिक शास्त्रीय ज्ञान संपादन करण्यास्तव त्यांच्या बुद्धीस अकारण शीण घेण्याचे काहीच प्रयोजन नव्हते. आता दर्शविलेल्या या कारणास्तव शिवाजीचे लक्ष या गोष्टीकडे वेधले न जाणे यात अस्वाभाविक असे काहीच नव्हते. हे जरी खरे असले तथापि शिवाजीस या गोष्टींची आवश्यकता तीव्रपणे भासत असे ही गोष्ट अलीकडे प्रसिद्ध झालेल्या 'इंग्लिश रेकॉर्डस् ऑन् शिवाजी' या इंग्रजी ग्रंथात पोर्तुगीज, इंग्रज इत्यादी जे पाश्चात्त्य लोक त्या काळी महाराष्ट्रदेशात व्यापारानिमित्त वास्तव्य करून होते, त्यांच्याकडे तोफा, बंदुका, दारूगोळा, दारू तयार करण्यास लागणारा सोरा इत्यादी वस्तू त्यांस विकत देण्याविषयी शिवाजीची जी पत्रे उपलब्ध झाली आहेत त्यावरून दिसून येतें. *

---

*टीप - इंग्लिश, रेकॉर्ड्स् ऑन् शिवाजी भाग - १ - लेखांक २१३, २६८, ३६९, ३७०, ४२०, व ४२४ या लेखांकात अनुक्रमे, शिवाजी शिसे, तोफा राजापूर येथील फ्रेंच वखारवाल्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहे (इ. स. १६७७); एंजिनियर्स, मार्टर्स, ग्रेनॅडोज (मोठी तोफ) यांची शिवाजी आपलेकडे मागणी करीत आहे (इ. स. १६७१); शिवाजीच्या वकिलाने इंग्रजांकडे दोन तीन मोठ्या तोफांची मागणी केली (इ. स. १६७३); तह झाल्यावर दोनच तोफा काय, पण मागाल तितक्या तोफा व लागेल ते सामान देऊ असे इंग्रजांनी भिमाजी पंडितास कळविले ( इ. स. १६७३); निकामी तोफांची एक दलाल दर हंड्रेडवेटास रुपये (९) नऊप्रमाणे मागणी करीत आहे; शिवाजीने फ्रेंचांकडून अठ्ठयाऐंशी तोफा आणि तीन हजार मण शिसे विकत घेतले आहे; अशा प्रकारचे उल्लेख आढळतात. दुसऱ्या भागात लेखांक २५१ हे पत्र १६७७ सालात शिवाजीनें वुइल्यम लेगूहॉर्न यास लिहिले असून त्यात तोफांचे गाडे तयार करणारे व सुरुंग लावणारे लोक नोकर ठेवावयाचे आहेत सबब ते आम्हांस द्यावे असे शिवाजीने मागणे केले आहे. या सर्व उल्लेखांवरून शिवाजीने ही सामग्री महाराष्ट्रात तयार करणेची योजना केलेली नव्हती हे उघड दिसून येते.*

आता शिवाजीचे समकालीन व त्याच्या ध्येयाचे साहाय्यकारी जे महाराष्ट्राचे दुसरे विचारी नेते श्रीसमर्थ रामदासस्वामी, त्यांचे ध्येय कोणत्या स्वरूपाचे होते व रामदास सांप्रदायाची स्थापना महाराष्ट्रात त्यांनी कोणत्या हेतूस्तव केली व तत्कालीन क्रांतीस त्यांच्या सांप्रदायाचा कोणत्या प्रकारचा उपयोग झाला याचे आम्ही दिग्दर्शन करतो. तत्पूर्वी समर्थ रामदासस्वामी कोणत्या ज्ञानाचे भोक्ते व पुरस्कर्ते होते याचे दिग्दर्शन करणे अवश्य आहे. समर्थ हे अध्यात्मज्ञानाचे भोक्ते व पुरस्कर्ते होते, हे त्यांच्या वाङ्मयावरून सहज दिसून येण्यासारखे आहे. समर्थांनी दासबोधाच्या पाचव्या दशकाच्या चवथ्या, पाचव्या व सहाव्या समासांत बहुधा ज्ञान-विशुद्ध ज्ञान-निरूपण याचे विवरण केले आहे. अध्यात्मज्ञान व भौतिक शास्त्रीय ज्ञान यांपैकी महत्त्वाचे कोणते व त्यापैकी कोणते ज्ञान संपादन करणे मानवी प्राण्याचे कर्तव्य आहे याविषयी समर्थांनी या समासांत आपले मत व्यक्त केले आहे. समर्थांचा आशय लक्षात येण्यास्तव त्यांच्या विवेचनातील महत्त्वाची थोडी वचने येथे उद्धृत करतो. पाचव्या दशकाच्या चवथ्या समासाच्या शेवटी -

**ऐसे उपदेश अनेक । परि ज्ञानेंविण निरर्थक ।।**
**येविषईं असे एक । भगवद्वचन ।। ३१ ।।**
**।। श्लोक ।। नानाशास्त्रं पठेल्लोको नानादैवतपूजनम् ।।**
**आत्मज्ञानं विना पार्थ सर्वकर्म निरर्थकम् ।।**
**याकारणें ज्ञानासमान । पवित्र उत्तम न दिसे अन्य ।।**
**म्हणौन आधीं आत्मज्ञान । साधिलें पाहिजे ।। ३२ ।।**

असा अभिप्राय व्यक्त केला आहे.

समर्थांच्या काळीं जितक्या विद्या ज्ञात होत्या त्या विद्यांच्या ज्ञानाचा नामनिर्देश करून त्या विद्यांचें ज्ञान तें खरें ज्ञान नव्हे असें समर्थांनीं पुढील ओंवींत दर्शविलें आहे.

**नाना सृष्टींची परीक्षा । नाना विस्तारपरीक्षा ।।**
**नाना पदार्थपरीक्षा ।। हें ज्ञान नव्हे ।। २५ ।।**

दशक ५ समास ५ वा

या समासातील समर्थांच्या ओव्यांत भौतिक शास्त्रांच्या सर्व शाखांचा समावेश होतो. याच समासात समर्थांनी

**नाना लाघवें चित्रकळा । नाना वाद्यें संगीतकळा ।।**
**नाना प्रकारें विचित्र कळा । हें ज्ञान नव्हे ।। ३० ।।**
**आदिकरूनि चौसष्टि कळा । याहि वेगळ्या नाना कळा ।**
**चौदा विद्या सिद्धि सकळा । हें ज्ञान नव्हे ।। ३१ ।।**

याप्रमाणे भौतिक शास्त्रीय ज्ञानाची फोड करून या विद्यांचे ज्ञानास ज्ञान म्हणावयाचे नाही तर काय म्हणावयाचे याविषयी खालील अभिप्राय व्यक्त केला आहे.

**असो सकळ कळाप्रवीण । विद्यामात्र परिपूर्ण ।**
**तरी ते कौशल्यता परी ज्ञान । म्हणों चि नये ।।**

भौतिक शास्त्रीय ज्ञानास फारतर कुशलता म्हणण्यास हरकत नाही, परंतु ज्ञान ही संज्ञा त्यास देणे उचित नाही, याप्रमाणे अभिप्राय समर्थांनीं व्यक्त करून समर्थ म्हणतात,

**हें ज्ञान होयेसें भासे । परंतु मुख्य ज्ञान तें अनारिसें [१] ।**
**जेथें प्रकृतीचें पिसें । समूळ वाव[२] ।। ३ ।।**

दशक ५ समास ५ वा

आता दर्शविल्याप्रमाणे बहुधा ज्ञानाचे विवेचन करून सहाव्या समासांत ज्ञान कशास म्हणावे याची चर्चा व विवेचन समर्थांनी केले आहे.

**जेथून हें सर्वही प्रगटे । आणी सकळही जेथें आटे ।**
**तें ज्ञान जालियां फिटे । भ्रांति बंधनाची ।। १६ ।।**
**जें या चराचराचें मूळ । शुद्ध स्वरूप निर्मळ ।**
**या नांव ज्ञान केवळ । वेदांतमतें ।। १८ ।।**
**शोधितां आपुलें मूळ स्थान । सहजचि उडे अज्ञान ।**
**या नांव म्हणिजे ब्रह्मज्ञान ।। मोक्षदायेक ।। १९ ।।**

याप्रमाणे ज्ञान कशास म्हणावे याची फोड केल्यावर पूर्वकाळी हे ज्ञान संपादन करून कोण कोण पैलपार गेले त्यांची नावे समर्थांनी नमूद केली आहेत. वेदाभ्यास न केलेल्या त्याचप्रमाणे संस्कृतप्राकृतभाषा व त्यांतील ग्रंथ न समजणाऱ्या माणसावर सद्गुरूची कृपा झाली तर त्यास ते प्राप्त होते, असे समर्थांनी विधान केले आहे. प्राकृतभाषेपेक्षा

१. वेगळे. २. जेथे मायेचे वेड सर्वथैव मिथ्या ठरते

संस्कृतभाषा ही श्रेष्ठ आहे व या भाषेत सर्वांत श्रेष्ठ वेदान्त तत्त्वज्ञान हे आहे. या वेदान्त तत्त्वज्ञानाचा अतिगहन मथितार्थ परमार्थ आहे. ह्या परमार्थाचे सद्‌गुरुवचनाने ज्ञान होते. सद्‌गुरूकडून प्राप्त होणाऱ्या परमार्थाचे स्वरूप श्रीसमर्थांनी खालील ओव्यांत विशद करून सांगितले आहे.

**अहं ब्रह्मास्मि माहावाक्य । येथीचा अर्थ अतर्क्ये ।।**
**तो ही सांगतों ऐक्य । गुरूशिष्य जेथें ।। ४४ ।।**
**ऐक शिष्या येथीचें वर्म । स्वयें तूंचि आहेसि ब्रह्म ।।**
**ये विषयीं संदेह भ्रम । धरूं चि नको ।। ४५ ।।**

दशक ५ समास ६ वा

येथपावेतो दिलेल्या समर्थांच्या वचनांवरून समर्थ अध्यात्मतत्त्वज्ञानांतर्गत अद्वैत तत्त्वज्ञानाचे अभिमानी व पुरस्कर्ते होते हे स्पष्टपणे दिसून येते. ज्ञानेश्वरापासून रामदास अवतीर्ण होत तोपावेतो पंढरपूरच्या श्रीविठ्ठलदैवताच्या वारकरीसांप्रदायी भक्तांचे ज्या प्रकारचे अध्यात्मज्ञान होते त्याच प्रकारचे समर्थांचे अध्यात्मज्ञान होते असे दिसून येते. असे स्थितीत समर्थकाली जी विचारक्रांती उदयास आली त्यात समर्थांच्या अध्यात्मज्ञानाच्या स्वरूपाचे वैशिष्ट्य कोणत्या प्रकारचे होते याचे प्रस्तुतस्थळी स्पष्टीकरण करणे अगत्याचे आहे. समर्थांनी अध्यात्मज्ञानाची एका नवीन पद्धतीने केलेली मांडणी हेच त्यांच्या अध्यात्मज्ञानाचे वैशिष्ट्य होय. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेस्तव सैन्य, पायदळ, घोडदळ, शस्त्रास्त्रे इत्यादी प्रकारची जी भौतिक साधने संपादन करण्याचा खटाटोप केला तशा प्रकारची साधने संपादन करण्याचा खटाटोप समर्थांनी केला नाही. त्यांच्या उदयापूर्वी भक्तिमार्गास जे प्राधान्य वारकरीसांप्रदायी संतांनी दिले ते समर्थांनी मान्य केले व त्यांनी प्रस्थापित केलेल्या समर्थसंप्रदायाची उभारणी प्राधान्येकरून भक्तिमार्गावरच केली. वारकरी व समर्थसंप्रदायी भक्तिमार्ग ही समान बाब असता समर्थांनी आपल्या सांप्रदायात अन्य कोणत्या महत्त्वाचे बाबींचा समावेश केला याचे प्रस्तुत स्थळी दिग्दर्शन करतो. पहिली महत्त्वाची बाब म्हटली म्हणजे पंढरीच्या श्रीविठ्ठल दैवताऐवजी श्रीरामदैवताची भक्ती हा समर्थसंप्रदायाचा विशेष होय. या महत्त्वाच्या फरकाच्या बाबीची उपपत्ती व छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कल्पनेस या फरकाची झालेली उपयुक्तता या विषयीची प्रस्तुत स्थळी अल्प चर्चा व विवेचन करणे युक्त आहे. समर्थांच्या घराण्यात त्यांच्या पूर्वीच्या नऊ-दहा पिढ्यांतील पुरुष नि:सीम रामभक्त होते व त्यांचे कुलदैवत व इष्टदैवत श्रीराम हेच होते.

समर्थांचे वडील हे स्वत: नि:सीम श्रीरामभक्त होते. समर्थांच्या बालपणापासून त्यांच्या वडिलांचे सहवासात ते वाढल्यामुळे त्यांच्या ठायी नि:सीम रामभक्ती उत्पन्न झाली होती. बालवयातच जांब गावच्या बाहेरील मारुतीचे पारानजीक त्यांना श्रीरामदर्शन कसे घडले याचे वर्णन उपलब्ध झाले आहे.

याप्रमाणे समर्थांची मनोरचना बनून त्यांनी वयाच्या बाराव्या वर्षी लग्नसमयी पलायन केले व ते नाशिकशेजारील पंचवटीनजीक टाकळी गावी वास्तव्य करण्यास गेले. तेथे त्यांनी बारा वर्षे वास्तव्य करून तपश्चर्या केली. या त्यांच्या त्या स्थळीच्या वास्तव्यात रामकथाश्रवण हा त्यांच्या दैनिक कार्यक्रमांपैकी एक महत्त्वाचा भाग होता. त्याच काळात संस्कृत वाल्मीकिरामायण या ग्रंथाच्या काही कांडांची त्यांनी स्वहस्ते नक्कल केली, अशी माहिती नूतन संशोधनात उपलब्ध झाली आहे. बारा वर्षे तपश्चर्या केल्यावर समर्थांनी सर्व भरतखंडात यात्रेनिमित्त पर्यटन केले. या पर्यटनात निरनिराळ्या स्थळी त्यांच्या निदर्शनास ज्या गोष्टी आल्या त्यावरून त्यांची अशी खात्री झाली की, रामायणकाळी जी स्थिति विद्यमान होती तीच स्थिती सद्य:काली भरतखंडात अस्तित्वात आली आहे. रामाने एका काळी ज्या शत्रूंचा संहार केला तेच शत्रु बळावले असून भारतीय जनतेचा अनन्वित छळ करून तीस पीडा देत आहेत. भरतखंडाच्या त्या काळच्या स्थितीच्या निरीक्षणाअंती समर्थांच्या निदर्शनास ह्या गोष्टी आल्यावर समर्थांसारख्या बुद्धिमान पुरुषाचे मनात या विपत्तींतून भारतीय जनतेची मुक्तता कोणत्या मार्गाने करावयाची याची चिंता रात्रंदिवस घोळू लागली. अशा प्रकारच्या मन:स्थितीत समर्थ आपले पर्यटन समाप्त करून टाकळीस त्यांच्या वयाच्या छत्तीसाव्या वर्षाचे सुमारास परत आले. तेथे आल्यावर छत्रपती शिवाजीमहाराज यांनी स्वराज्यस्थापनेचा व स्वातंत्र्य साध्य करण्याचा जो नूतन उपक्रम सुरू केला होता त्याची वार्ता समर्थांचे कानावर गेली व त्यांनी गोदातटाकाचे वास्तव्य सोडून देऊन कृष्णातटाकाच्या मसूर गांवी ते वास्तव्य करण्याकरिता आले. भगवद्गीतेसारख्या नामांकित ग्रंथाचे दृढ परिशीलन समर्थांचे झाले होते. भगवद्गीतेत धर्माची ग्लानी व ऱ्हास झाला असता श्रीकृष्णांनी

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।**

अ. ४ श्लोक ७ वा

या वचनांत परमेश्वराच्या अवताराचा संभव ग्रथित केला आहे. स्वत: समर्थांना ही

गोष्ट पटून त्यांनी 'धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।। जाहले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें ।।' हा सिद्धांत ग्रथित केला होता. भगवंताचे हे वचन, वाल्मीकी ऋषींनी कथन केलेली रामकथा व भरतखंडांतील समर्थांनी स्वत: अवलोकन केलेली देशस्थिती या तिन्ही गोष्टींमुळे महाराष्ट्रात त्या काळी राम अवताराच्या काळाची व घटनांची पुनरावृत्ती होत आहे असा दृढ विश्वास समर्थांच्या मनात उत्पन्न झाला. छत्रपती शिवाजीमहाराज हे साक्षात् श्रीरामाचे अवतार असून महाराष्ट्रातील जनतेस राक्षसांच्या जाचांतून सोडविण्याचे कार्य रामरूपी शिवाजी करीत आहे अशी समर्थांची श्रद्धा बनली व ही भावना त्या काळच्या महाराष्ट्रीय जनतेत त्यांनी मूर्तस्वरूपात अस्तित्वात आणिली असे त्या काळच्या एका पोवाड्यांतील 'हनुमंत अंगद रघुनाथाला । जेधे बादल शिवाजीला' या कडव्यावरून दिसून येते. (भा. इ. सं. मंडळ चतुर्थ संमेलनवृत्त पान १७६).

अशा प्रकारे नैसर्गिक श्रद्धाळू मनोवृत्तीच्या महाराष्ट्रातील अखिल जनतेच्या मनात हीच श्रद्धा निर्माण करण्याचा महत् प्रयास, चाफळ येथे श्रीरामाच्या मूर्तीची स्थापना, श्रीहनुमंताच्या मूर्तीची ठिकठिकाणी स्थापना, श्रीरामाचे जन्मोत्सव, रामकथा मराठी भाषेत तयार करून तिच्या प्रसारार्थ महाराष्ट्रीय जनतेत महाराष्ट्र व भरतखंडांतील इतर प्रांत यात महंताधिष्ठित अनेक मठांची स्थापना इत्यादी साधनांनी समर्थांनी केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ध्येयसिद्धीस समर्थांच्या या प्रयासाची फार मोठी मदत झाली. समर्थांच्या आध्यात्मिकज्ञानात समाविष्ट होणाऱ्या या बाबींशिवाय त्यांच्या सांप्रदायाचा जो दुसरा एक महत्त्वाचा विशेष होता त्याचे प्रस्तुत स्थळी दिग्दर्शन करणे आवश्यक आहे. समर्थांपूर्वीच्या महाराष्ट्रसमाजाच्या अध्यात्मज्ञानाच्या नेत्यांनी मानवी प्राण्याच्या ऐहिक जीवनाचे म्हणजे प्रपंचाचे अथवा राजकारणाचे महत्त्व महाराष्ट्रीय जनतेस पटवून देण्याचा निश्चित स्वरूपाचा प्रयत्न केल्याचे दिसत नाही. समर्थांनी या बाबतीत त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या संतांचे धोरण सोडून देऊन वैयक्तिक प्रपंच त्याचप्रमाणे राष्ट्रीय प्रपंच म्हणजेच राजकारण प्रत्येक मानवी प्राण्याने नेटकेपणे करण्याविषयी कळकळीचा उपदेश केला. इतकेच नव्हे, तर प्रपंचाकडे दुर्लक्ष करून त्याची हेळसांड करणारास त्यांनी करंट्याच्या कोटींत काढिले. प्रपंच वैयक्तिक अगर राष्ट्रीय कार्य नेटकेपणे करण्याकरिता निष्क्रियता सोडून देऊन शिकस्तीचा प्रयत्न करणे हे प्रत्येकाचे श्रेष्ठ कर्तव्य आहे हे तत्त्व महाराष्ट्रीय जनतेच्या मनावर समर्थांनीं पूर्णपणे बिंबवून दिले. या त्यांच्या शिकवणीचे महत्त्व महाराष्ट्रीय जनतेस पटविण्याकरिता प्रयत्न म्हणजेच देव असे समर्थांनी प्रतिपादन

केलें. समर्थांच्या या शिकवणीचा महाराष्ट्रीय जनतेच्या मनोरचनेवर उत्कृष्ट परिणाम होऊन स्वराज्य स्थापनेचे जे महत्कार्य छत्रपती शिवाजीमहाराजांनी आरंभिले होते ते यशस्वी करण्यात महाराष्ट्रातील अखिल जनता छत्रपती शिवाजीमहाराजांस अनुकूल झाली.

आतापावेतो केलेल्या विवेचनावरून छत्रपती शिवाजीमहाराज व श्रीसमर्थ रामदासस्वामी यांच्या निधनापावेतो मुख्यत्वेकरून अध्यात्मज्ञानाकडेच महाराष्ट्रीय जनतेचा ओढा होता. इंग्रज लोकात अस्तित्वात आलेल्या मागे वर्णन केलेल्या नूतन घटना व त्या देशात अस्तित्वात आलेले भौतिक ज्ञानविचार व त्या देशातील लोकांवर त्या विचारांची बसलेली विलक्षण पकड व तिचे योगाने हजारो मैल दूर असलेल्या प्रदेशांत स्थलांतर करून वैयक्तिक व राष्ट्रीय प्रपंच परम सुखदायी करण्याची धडपड या महत्त्वाच्या व राष्ट्रीय चारित्र्यावर विलक्षण परिणाम करणाऱ्या गोष्टी यांचा महाराष्ट्र देश व महाराष्ट्रीय लोक यांच्यात त्या काळी पूर्ण अभाव होता. राजवाड्यांनी या महत्त्वाच्या मुद्द्यांविषयी एका स्थळी केलेले विवेचन अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळे ते येथे उद्धृत करतो :-

## महाराष्ट्रांतील शास्त्रसिद्ध शस्त्रनिर्माणाभाव

येथें एक आनुषंगिक प्रश्न असा निघतो की, टोपीवाल्यांकडून कारागीर, बंदुका, तोफा व दारूगोळा जो शहाजी घेई तो त्याने महाराष्ट्रात त्यावर हुकूम बनविण्याची व्यवस्था का केली नाही ? अथवा शहाजीचा मुलगा शिवाजी याने तरी का केली नाही ! किंबहुना बाजीराव बल्लाळ, बाळाजी बाजीराव व नाना फडणवीस ह्या गृहस्थांनी का केली नाही ? उत्तम हत्यारांकरिता दुसऱ्याचे मिंधे राहण्याची लज्जा त्यांना कशी वाटली नाही ? या प्रश्नाला उत्तर एकच आहे व ते अगदी साधे आहे. ते हे की रेखीव नेमके हत्यार बनविण्याची कला पैदा होण्यास शास्त्रीय ज्ञानाची जी पूर्वतयारी राष्ट्रात व्हावी लागते ती त्या काळी महाराष्ट्रात नव्हती. शहाजीच्या हयातीत युरोपात डकार्ट, बेकन इत्यादी विचारवंत सृष्टपदार्थ संशोधनकार्याचे वाली जारीने पंचभूतांचा शोध लावण्यास लोकांना प्रोत्साहित करीत होते आणि आपल्या इकडे एकनाथ, तुकाराम, दासोपंत, निपटनिरंजन इत्यादी संत पंचमहाभूतांना मारून ब्रह्मसाक्षात्कारात राष्ट्राला नेऊन मुक्त करण्याच्या खटपटीत होते ! अशांना स्क्रू, टाचणी, बंदूक व तोफ यांचा विचार वमनप्राय वाटल्यास त्यात नवल कसचे ? थोडक्यात आगस्ट कोट याच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे महाराष्ट्र त्या काली

Metaphysical अवस्थेत होतें, आणि Positive अवस्थेत येण्यास त्याला अद्याप पाचशे वर्षे अवकाश होता, म्हणजे शक २००० च्या सुमारास महाराष्ट्र Positive बनणार होते. * अशा अवस्थेत आपल्याला बनविता येत नाहीत ती श्रेष्ठ हत्यारे दुसऱ्याकडून विकत घेण्याखेरीज शहाजीला गत्यंतर नव्हते. सध्या महंमद, आफ्रिडी, चित्रळी, अफगाण इराणी इत्यादी अर्ध सुधारलेल्या लोकांची जी अवस्था आहे तीच आपली शहाजीच्या काली होती. उत्तम जर्मन, फ्रेंच किंवा रशियन बंदूक घेऊन जो आफ्रिडी माणूस चोऱ्या, दरवडे व हल्ले करितो, त्याहून शहाजीकालीन मराठा जास्त सुधारलेला होता हे खरे, परंतु शस्त्रांकरिता तो युरोपियनांचा आफ्रिडींच्या इतकाच परावलंबी होता. ह्या परावलंबित्वाचा अर्थ शहाजीच्या काळी कोणाच्या लक्षात कितपत आला असेल ते सांगण्यास साधन नाही, परंतु विष जे आहे ते जाणून खा की नेणून खा, आपला अम्मल केल्याशिवाय जसे राहात नाही, तसेच ज्याचे हत्यार त्याचे राज्य हा नियम - कोणाला समजो की न समजो - आपले कार्य केल्याशिवाय राहात नाही. अर्थात् मूळ हत्यार तयार करणारे जे फिरंगी, फ्रेंच, डच किंवा इंग्रज वगैरे युरोपियन त्यांना राज्य मिळवून देण्याकरिता न जाणतेपणे शहाजी प्रयत्न करीत होता असा अर्थ झाला आणि हा अर्थ शहाजी आणि त्याचे ब्राह्मण मुत्सद्दी यांच्या लक्षात यावा तसा मुळीच आला नाही. ज्या दिवशी व्हास्कोने कालिकतच्या चामूरीच्या थोबाडीत मारली तोच हिंदुस्थानचे साम्राज्य युरोपियनांच्या हातात जाऊ लागण्याचा पहिला दिवस होय. मूठभर फिरंगी लोकांनी एका हिंदू राजाला पहिले छूट कुंठित करावे असे त्यांच्याजवळ कोणते बरे सामर्थ्य होते ? का त्यांना दहा तोंडे व वीस हात होते ? की ते इजार नेसत होते व बायबल पढत होते म्हणून ते इतके प्रबळ झाले ? तर अनेक शोधांच्या साहाय्याने सिद्ध झालेली जी कारीगार हत्यारे, त्यात त्यांचे सामर्थ्य होते. ही हत्यारे म्हणजे युरोपियन शास्त्रीय संस्कृतीचा केवळ निष्कर्ष होत. ह्या हत्यारांच्या जोरावर एक युरोपियन हजार हिंदू, मुसलमानांना भारी होता. हा अर्थ शहाजीसारख्या धोरणी, दूरदर्शी, मतलबी व

---

*टीप : - राजवाड्यांनीं हे विचार सन १९२३ सालांत ग्रथित केले. या भागाच्या पुढील विवेचनांत प्रस्तुत काळीं भरतखंडास पॉझिटिव्ह स्टेजला नेणारे कांहीं भौतिक शास्त्रज्ञ भरतखंडांत उदयास आल्याचें दिसून येणार आहे. भरतखंडाची विद्यमान स्थिति व महायुद्धाच्या समाप्तीनंतर भरतखंडास प्राप्त होणारें स्थान या गोष्टी लक्षांत घेतल्यास राजवाड्यांचें या ओळींतील हें भाकीत खरें ठरेल यांत संशय नाहीं.

जागरूक सरदाराच्या लक्षात न यावा, अशीच तत्कालीन महाराष्ट्राची स्थिती होती. तेव्हा दोषाचा वाटा शहाजीप्रमाणेच तत्कालीन समाजावर पडतो, हे उघड आहे. सगळेच आंधळे, त्यात एकालाच सुळावर चढावण्यात मतलब काय ? या बाबीत शहाजीच्या पंगतीस अकबर, शहाजहान, मीर जुमला व अवरंगजेब असे सारेच पडतात. तेव्हा ह्या तत्कालीन भारतवर्षीय संस्कृतीतलाच सर्वसाधारण दोष होय हे कबूल करावे लागते.'

(राधामाधवविलास चंपू-प्रस्तावना परिच्छेद ५२ पान १०७ ते १०९)

छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ यांचे निधनानंतर अवरंगजेबानें दक्षिणेवर जी स्वारी केली तिची समाप्ती इ. स. १७०७ साली अवरंगजेबाच्या निधनाने झाली. या सत्तावीस वर्षांचे काळात महाराष्ट्रात सर्वत्र बादशाही सेना आणि मराठा सेनापती यांच्यातील युद्धाची अखंड धामधूम सुरू होती. देशात स्वस्थता आणि शांतता कोठेच नव्हती. सर्व महाराष्ट्रीय जनता स्वजीवितसंरक्षणाच्या फिकिरीत व खटाटोपात गर्क होती. इ. स. १७०७ नंतर शाहू छत्रपतींचे महाराष्ट्रात आगमन होऊन शाहू व त्यास मिळालेले सरदार आणि ताराबाई व तिच्या पक्षाचे सरदार व मुत्सद्दी यांच्या झटापटी सुरू होऊन इ. स. १७१० त शाहूचे आसन स्थिर झाले, तेव्हापासून मराठ्यांच्या सत्तेचा सतत उत्कर्ष होत जाऊन भरतखंडभर तिचा प्रसार झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या भौतिक साधनाचे जोरावर म्हणजे कूटयुद्धपद्धतीवर स्वराज्याची स्थापना केली त्याच साधनाचे जोरावर, बाळाजी विश्वनाथ, बाजीराव बल्लाळ, व बाळाजी बाजीराव या तीन पेशव्यांनी मोंगल सैन्यास नामोहरम करून प्रचंड विजय संपादन केले. भोपाळच्या लढाईत निजामावर बाजीरावाने जो मोठा विजय मिळविला तो त्याने अंगीकारलेल्या कूटयुद्धपद्धतीचे जोरावर मिळविला. निजामावर एवढा मोठा प्रचंड विजय मिळवून निजामाने तहाचे बोलणे केले ते बाजीरावाने तत्काळ का मान्य केले याचे कारण बाजीरावने या विजयाविषयी लिहिलेल्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे. निजामाजवळ भारी तोफखाना होता. बाजीरावापाशी त्याची मोठी उणीव होती. उघड्या मैदानावर युद्धाचा प्रसंग आला असता निजामाच्या तोफखान्यापुढे बाजीरावाचा टिकाव लागणे दुर्घट होते. या गोष्टीची बाजीरावास पूर्ण जाणीव असल्यामुळे निजामास अडचणीचे जागी कोंडून त्याचे अन्न व दाणा-वैरण बाजीरावाने बंद करून त्यास हैराण केले व त्यास त्याने दाती तृण धरून तह करण्यास भाग पाडले. या एकाच उदाहरणावरून युद्धांत विजय संपादन करण्याचे तोफखाना हे जे एक बलशाली साधन त्यात मराठ्यांची कमतरता असून मोगलांचे श्रेष्ठत्व होते ही गोष्ट सिद्ध होते. या युद्धाप्रमाणेच इतर युद्धांत मराठ्यांस त्यांच्या कमतरतेची पूर्ण जाणीव

असून ती नाहीशी करण्याकडे या तीन पेशव्यांपैकी अगर त्यांच्या मुत्सद्दयांपैकी कोणाचेच लक्ष गेले नाही. पेशव्यांचे राजवटीत वेद व शास्त्रपठनास, त्याचप्रमाणे पुरातन संस्कृत विद्यास उत्तेजन श्रावणमासाच्या दक्षिणादानाने देण्यात येत असे. त्याच सुमारास पाश्चात्त्य युरोपियन राष्ट्रांत ज्या भौतिक विद्यांचे अध्ययन केले जात असे त्या विद्यांची महती व प्रभाव महाराष्ट्रातील लोकांस ज्ञात नव्हती. पानिपतचे पराभवानंतर पेशवाईच्या उत्तरार्धास सुरुवात झाली व त्याची समाप्ती इ. स. १८१८ सालांत मराठी साम्राज्य लयास गेले ते वेळी झाली. या काळांत नाना फडणवीस आणि महादाजी शिंदे हे दोन मराठेशाहीतील नामांकित पुरुष झाले. या काळांत मराठे व इंग्रज यांचा परस्पर संबंध निकट येत गेला. या निकट संबंधामुळे या दोन नामांकित मुत्सद्द्यांपैकी पाश्चात्त्य राष्ट्रांनी उभारलेल्या सैन्याप्रमाणे कवाईत शिकविलेले सैन्य तयार केल्यास ते युद्धात विजयप्राप्ती करणारे एक उत्तम साधन आहे ही गोष्ट महादाजी शिंदे यांच्या ध्यानात आली. महादाजी शिंदे व इतर तत्कालीन मराठे सरदार यांनी पाश्चात्त्य राष्ट्रांतील पोट भरण्याकरिता आलेल्या लष्करी कलानिपुण भटक्या लोकांस मोठमोठे तनखे देऊन आपल्या नोकरीत ठेविले व त्यांचे देखरेखीखाली कवाईत शिकलेली पलटणे पाश्चात्त्य राष्ट्रांच्या पद्धतीची तयार केली. महादाजी शिंद्यांनी बहुतेक या प्रकारचे फ्रेंच सेनानी नोकर ठेविले, व कवाईत शिकविलेले मोठे सैन्य तयार केले. राजस्थानातील राजे व महादजी शिंदे यांच्या ज्या लढाया झाल्या त्यात राजपुतांवर त्यांनी जे विजय संपादन केले ते मुख्यत्वेकरून या प्रकारे शिक्षण देऊन तयार करविलेल्या सैन्याचे साहाय्याने मिळविले.

कवाईत शिकविलेल्या सैन्याचा प्रभाव ज्याप्रमाणे मराठ्यांच्या प्रत्ययास आला त्याचप्रमाणे दुसऱ्या एका महत्त्वाच्या बाबीचा प्रत्यय मराठ्यांच्या पाश्चात्त्य राष्ट्रांशी झालेल्या संसर्गाने त्यांस आला होता. ही बाब म्हणजे पाश्चात्त्य राष्ट्रांच्या तोफखान्याची संहारशक्ती ही होय. वसईच्या वेढ्यात पोर्तुगीज लोकांच्या तोफांचा प्रखर मारा मराठी सैन्याला कसा असह्य झाला व त्यांच्या माऱ्यामुळे मराठ्यांचे सैन्य कसे भाजून काढले गेले याचे हुबेहूब चित्र साष्टीच्या वेढ्यांत मिळविलेल्या विजयासंबंधी लिहिलेली जी पत्रे प्रसिद्ध झाली आहेत त्यात केले आहे. 'बरकंदाजी व तोफाजी फिरंगियांची निस्सीम म्हणावी तैसी' + + + + 'फिरंगियांनी सफेलीच्या आतून मेढा घालून पेटी भरून तोफा लावून तयार होताच तेथें फिरंगी बळावून हुके गरनाळ्याच्या दारूच्या पोत्यास आगा लावून मार केला व रेजगिरीचा मार सीमेपरता केला. लोकावरी अग्नीचा पर्जन्य करून भाजून काढले. + + + फिरंगी अग्नीचा पुला होता' (महाराष्ट्रधर्म पृ. ४८१). याप्रमाणे

पोर्तुगीज लोकांच्या तोफखान्याच्या प्रभावाचे वर्णन चिमाजी आप्पाने केले आहे. पाश्चात्त्य राष्ट्रांच्या युद्धपद्धतीच्या अंतर्गत प्रभावशाली अशा या तोफखान्याच्या साधनाचा अनुभव मराठ्यांस ज्ञात झाल्यावर कवाईत शिकवून तयार केलेल्या कंपूप्रमाणे पेशवे, शिंदे, होळकर, भोसले इत्यादींनी पाश्चात्त्य युद्धकलेत निपुण असणारे सेनानी आपल्या नोकरीत ठेवून त्यांचे देखरेखीखाली पाश्चात्त्य राष्ट्रांच्या तोफखान्यासारखा तोफखाना तयार केला; परंतु मराठेशाहीच्या उत्तरार्धात झालेल्या महादजी शिंदे व नाना फडणीस यांच्यासारख्या नामांकित मुत्सद्दयांचे लक्ष हे प्रभावशाली युद्धसाधन ज्या ज्ञानाने प्राप्त होते ते ज्ञान महाराष्ट्रातील लोकांस करून द्यावे असे त्यांस भासल्याचे दिसत नाही व तशा प्रकारचा प्रयत्न त्यांनी केला नाही. नाही म्हणावयास यशवंतराव होळकरास पाश्चात्त्यांच्या तोफखान्याचे महत्त्व व प्रभाव पटून त्याने तोफा तयार करण्याचा एक कारखाना सुरू करून तोफा ओतविण्यास सुरुवात केली व तोफा तयार करण्याचे वेड त्यास लागून अखेर त्यांतच त्याचा अंत झाला ! भौतिक शास्त्रीय ज्ञानाचे महत्त्व व ते ज्ञान लोकांस देऊन त्या ज्ञानात आपल्या लोकांनी प्रावीण्य संपादन करून पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज यांची बरोबरी संपादन करण्याची आवश्यकता या गोष्टींची महाराष्ट्रातील पुढारी नेत्यांस कधी जाणीव झाली नाही, व याचे अखेर पर्यवसान पाश्चात्त्य इंग्रजांकडून मराठ्यांच्या पराभवात व भरतखंडावर महाराष्ट्रीयांची राजकीय सत्ता नष्ट होऊन ती इंग्रजांचे हातात जाण्यात झाले ! इ. स. १८१८ सालापूर्वी पन्नास साठ वर्षे अगोदर इंग्रजांनी हे भविष्य वर्तविले होते. ही गोष्ट अलेक्झांडर डाऊ याच्या इतिहासातील खालील उताऱ्यावरून दिसून येते.

It is apperent that the immence regions of Hindusthan might well be reduced by a handfull of regular troops. Ten thousand European Infantry together with the sepoys in the company's service are not only sufficient to conquer all India, but with proper policy to maintain it for ages as an appendage of the British crown.( महाराष्ट्र धर्म पृ. ४८१ )

मराठी साम्राज्य लयास जाण्यापूर्वी मराठ्यांशी इंग्रजांची जी युद्धे झाली त्यांत इंग्रजांच्या प्रभावी तोफखान्यामुळे युद्धात मराठ्यांचे पराभव होत गेले. महादाजी शिंदे याने तयार केलेल्या कवाईती फौजेचे सामने इंग्रजांबरोबर त्याच्या निधनानंतर जे झाले त्यांच्या इतिहासावरून कवाइती सैन्यास तोफखान्याची जोड नसेल तर ते सैन्य युद्धांत विजय मिळविण्यास निरुपयोगी ठरते, हा प्रत्यय मराठ्यांस आला. इंग्रजांच्या लांब पल्ल्याच्या

तोफखान्यापुढे मराठ्यांचा आखूड पल्ल्याचा तोफखाना लुला पडला. कारण इंग्रजांच्या प्रभावशाली तोफखान्याने शिंद्यांच्या फौजेचा फार अल्प काळांत फन्ना उडे व अखेर इंग्रज विजयी ठरत.

आतापावेतो केलेल्या विवेचनावरून श्रेष्ठ प्रकारचे भौतिक शास्त्रीय ज्ञान व त्या ज्ञानाचे योगाने श्रेष्ठ प्रतीची शस्त्रास्त्रे इंग्रजांपाशी असल्यामुळे व मराठ्यांपाशी त्यांचा अभाव असल्यामुळे मराठ्यांना इंग्रजांपुढे शरणागती घ्यावी लागली हे स्पष्ट झाले आहे. इ. स. १७१० पासून इ. स. १८१८ सालापावेतो महाराष्ट्रात भौतिक ज्ञानविचाराची कोणत्या प्रकारची स्थिती होती व इंग्रजांच्यापाशी मराठ्यांपेक्षा हे ज्ञान किती श्रेष्ठ प्रकारचे होते याचे आम्ही येथपावेतो दिग्दर्शन केले आहे. याच काळात अध्यात्मज्ञान विचाराची महाराष्ट्रात कोणत्या प्रकारची स्थिती होती याचे आम्ही थोडक्यात दिग्दर्शन करतो. समर्थांनी अध्यात्मज्ञान विचाराची जी नवीन मांडणी केली तिचे पर्यावसान स्वराज्य स्थापनेत व स्वतंत्र मराठा राष्ट्राच्या अस्तित्वात झाल्यावर समर्थांनी प्रचलित केलेली अध्यात्मज्ञानाची नूतन मांडणी त्यांच्या निधनानंतर निरुपयोगी ठरून विलीन पावली; व तेव्हापासून आजतागायत श्रीपंढरपूरच्या विठ्ठलदेवतेची भक्ती करणारा वारकरीसांप्रदाय, त्याचप्रमाणे श्रीरामदैवताची भक्ती करणारा दुसरा एक रामदासी संप्रदाय कसाबसा तग धरून अस्तित्वात आहे. श्रीविठ्ठल देवतेची भक्ती करणाऱ्या वारकरी संप्रदायात जो चिवटपणा प्रस्तुतकाळी दिसून येतो तो समर्थसंप्रदायांत राहिला नाही, व या संप्रदायाची जी पकड एकेकाळी महाराष्ट्रीय जनतेवर होती तीही सर्वसामान्य महाराष्ट्रीय जनतेवर राहिली नाही. इ. स. १७१० सालापासून इ. स. १८१८ सालापावेतो छत्रपती श्री शिवाजी महाराज व श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या काळी महाराष्ट्रीय समाजात जो अध्यात्मतत्त्वज्ञानविचार अस्तित्वात होता तो ओहोटीस लागला. मराठ्यांच्या राजकीय सत्तेचा प्रसार सर्व भरतखंडांत सपाट्याने व जोराने होत असल्याने महाराष्ट्रीय समाज वैभवाचे शिखरावर चढू लागला. यामुळे संपत्ती व सुखलोलुपता महाराष्ट्रीय समाजाच्या वरच्या थरांत प्रसृत झाली. भरतखंडाच्या निरनिराळ्या प्रांतांवर सालोसाल मराठ्यांच्या होणाऱ्या स्वाऱ्या, युद्धे, राजकारणे यांत महाराष्ट्रातील वरिष्ठ वर्ग गर्क होता. महाराष्ट्रीय समाजातील वरिष्ठ वर्गाकडून होणाऱ्या या हालचालींमुळे महाराष्ट्रीय समाजांतील सामान्य व कनिष्ठ जनतेस विपुल धंदे व त्यापासून आर्थिक प्राप्ती होऊ लागली. या काळात नामांकित असा कोणी अध्यात्मज्ञान विचाराचा नेता उदयास आला नाही. या काळात

शांतिक पौष्टिक कर्मे, हव्यकव्य, हरिदास, पुराणिक, वेदान्त तत्त्वज्ञानाचे प्रवचनकार हे पूर्वापार चालत आलेल्या पद्धतीने आपले धर्मविषयक व्यवसाय करीत होते. स्मृतिप्रणीत धर्माची व महाराष्ट्रधर्माची स्थापना करणे हे स्वराज्यस्थापनेचे ध्येय असल्यामुळे यज्ञयागादी कर्मे, त्याचप्रमाणे वेद व शास्त्रपठन यांस मराठा राज्यकर्त्यांकडून उत्तेजन व आर्थिक मदत भरपूर केली जात होती. या प्रकारची अध्यात्मज्ञान विचाराची महाराष्ट्रीय समाजाची स्थिती होती.

आता इ. स. १८१८ सालापासून प्रस्तुत काळापावेतो महाराष्ट्रीय लोकसमाजात कोणत्या प्रकारचे वैचारिक प्रवाह अस्तित्वात होते याचे आम्ही आता निरीक्षण करतो. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांची ब्रह्मवर्तास रवानगी करून देऊन महाराष्ट्रावर इंग्रजांनी आपली राजकीय सत्ता प्रस्थापित केल्यावर आपले स्वराज्य व स्वातंत्र्य गमावल्याबद्दल महाराष्ट्रातील सर्वसाधारण जनतेस म्हणण्यासारखे वाईट वाटले नाही. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीतील जुलूम, हालअपेष्टा, लुटालूट इत्यादी प्रकार इंग्रजांची सत्ता स्थापित होताच बंद पडले व जिकडे तिकडे शांतता नांदू लागली. नूतन सत्ता लोकप्रिय होण्यास्तव इंग्रजांनी अत्यंत धूर्ततेने प्रजेवर नवीन कर न लादता पूर्वापार चालत आलेल्या पद्धती बरीच वर्षे कांहीएक ढवळाढवळ न करता चालू ठेविल्या. इंग्रजांच्या या धोरणामुळे महाराष्ट्रातील सर्व लोक इंग्रज राज्यकर्त्यांवर अगदी खूष झाले. ते इतके की, इ. स. १८५७ सालात उत्तरभारतातील इंग्रजी सत्ता झुगारून स्वातंत्र्य मिळविण्याचा हिंदी लोकांनी जो प्रचंड खटाटोप केला त्याबद्दल महाराष्ट्रांतील लोकांपैकी कोणासही यत्किंचित सहानुभूती वाटली नाही. महाराष्ट्रात जिकडे तिकडे सामसूम होते. इंग्रजी सत्ता स्थापन होताच इंग्रजांनी पाश्चात्त्य शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्था महाराष्ट्रात स्थापन केल्या, व त्यांतून महाराष्ट्रातील लोकांस इंग्रजी भाषा व इंग्रजी विद्या यांचे ज्ञान देण्यास सुरुवात केली. इ. स. १८१८ पासून इ. स. १८७० पावेतो जो पन्नास-साठ वर्षांचा काळ गेला त्यात इंग्रजी भाषा व इंग्रजी विद्या यांत पारंगतता संपादन केलेले काही विद्वान निर्माण झाले, परंतु आपले स्वातंत्र्य व स्वराज्य इंग्रज राज्यकर्त्यांनी कोणत्या साधनांचे बळावर मिळविले याची मीमांसा करण्याकडे व या मीमांसेअंती जी कारणे प्रत्ययास येतील ती कशी दूर करावी याच्या चिंतनाकडे महाराष्ट्रातील फार थोड्या नेत्यांचे लक्ष गेले. गेलेले स्वातंत्र्य व स्वराज्य कसे परत मिळवावयाचे या महत्त्वाच्या प्रश्नाकडे या लोकांपैकी कोणाचेच लक्ष गेले नाही. इ. स. १८६४/६५ चे सुमारास महाराष्ट्रातील एक नामांकित विद्वान परशुरामतात्या

गोडबोले यांनी इतिहासावर लिहिलेली एक कविता प्रसिद्ध आहे. तत्कालीन सर्वसाधारण महाराष्ट्रीय जनतेची मनोरचना कशा प्रकारची होती याची उत्कृष्ट प्रकारची कल्पना येण्यास्तव या कवितेत त्यांनी 'मागील सर्व दुःखे (दुसऱ्या बाजीरावाचे कारकीर्दीतील महाराष्ट्रीय प्रजेचा छळ व नागवणूक) विसरून जा व इंग्रज प्रभूच्या राज्यात यथास्थित सुख उपभोगा' असा महाराष्ट्रीय जनतेस संदेश दिला आहे. परशुरामतात्यांच्या या उद्‌गारात महाराष्ट्रीय जनतेच्या मनाचे उत्कृष्ट प्रतिबिंब पडले आहे. या पन्नाससाठ वर्षांच्या काळात पाश्चात्त्य विद्येचे संस्कार झालेल्या महाराष्ट्रातील विद्वानांनी निर्माण केलेल्या मराठी वाङ्मयाचे निरीक्षण केले असता स्वराष्ट्राचे पूर्ववैभव नष्ट झाल्यामुळे मनात उत्पन्न झालेला उद्वेग, गतवैभव प्राप्त करून घेण्याची तळमळ, तत्प्रीत्यर्थ उपायांचे चिंतन इत्यादी विचारांचा कोठे मागमूसही आढळून येत नाही. या काळात जे काही वाङ्मय महाराष्ट्रीय विद्वानांनी निर्माण केले, ते म्हणजे सामान्य शालेय इंग्रजी ग्रंथांची भाषांतरे, अध्यात्मविषयक ग्रंथ, महाभारत, रामायण, भागवत इत्यादी ग्रंथांची गद्य भाषांतरे, महाराष्ट्रीय संतांचे ज्ञानेश्वरी, एकनाथीभागवत, दासबोध, संतलीलामृत, भक्तलीलामृत, हरिविजय, पांडवप्रताप इत्यादी ग्रंथ, संतकवींच्या कवितांच्या गाथा इत्यादी ग्रंथ निरनिराळ्या प्रकाशकांनी वेळोवेळी छापून प्रसिद्ध केले. या पन्नाससाठ वर्षांत एकही नामांकित ग्रंथ वर दर्शविलेल्या प्रश्नांची चर्चा करणारा महाराष्ट्रातील कोणाही विद्वानाने प्रसिद्ध केलेला आढळत नाही. या काळात इंग्लंडमध्ये भौतिक शास्त्रांचे ज्ञानांतर्गत जे शोध झाले व ज्यांविषयी पाश्चात्त्य विद्वानांनी नूतन ग्रंथ निर्माण केले त्यांची महाराष्ट्रातील विद्वान समजल्या जाणाऱ्या नेत्यांस गंधवार्ताही नव्हती. पाश्चात्यांच्या या ज्ञानाच्या योगाने जगातील निरनिराळ्या राष्ट्रांवर हे लोक आपले राजकीय वर्चस्व स्थापित करतात, ही गोष्ट महाराष्ट्रातील जे थोडे फार विद्वान व विचारवंत लोक होते त्यांच्या स्वप्नीही आली नव्हती. ही गोष्ट जरी खरी असली तथापि त्या काळाच्या महाराष्ट्रीय विचारवंत लोकांपैकी गोपाळराव हरी देशमुख यांस या गोष्टीची बरीच जाणीव झाली होती, असे त्यांच्या लेखांवरून दिसून येते. इंग्रजांच्या राष्ट्रीय चारित्र्याचा, त्याचप्रमाणे गतकालीन व त्यांच्या समकालीन महाराष्ट्रीयांच्या चारित्र्याचा देशमुखांनी सूक्ष्म अभ्यास करून उभयांच्या चारित्र्यांतील गुण व दोष यांचे परीक्षण उत्तमप्रकारे केले होते, 'असे शतपत्रे' या नावाच्या अलीकडे प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या ग्रंथावरून दिसून येते. या शतपत्रांपैकी 'हिंदुस्थानातील इंग्रजी राज्याचा विचार' (पा. ४५), 'इंग्रजी विद्या' (पा. ११२), 'संस्कृत

आणि इंग्रजी विद्या' (पा. १२७), 'प्राचीन ग्रंथांचे महत्त्व' (पा. १३६) 'सांप्रतचे पंडितांचे ज्ञान' (पा. १४६), 'संस्कृत ज्ञान' (पा. १४७), ही पत्रे प्रस्तुत मुद्दयाच्या विवेचनाच्या दृष्टीने फारच महत्त्वाची आहेत. 'प्राचीन ग्रंथांचे महत्त्व' या पत्रात देशमुखांनी खालील मत व्यक्त केले आहे. ''यास्तव ही समजूत मोडून सर्व लोकांस अशी इच्छा उत्पन्न झाली पाहिजे की, आम्ही आणखी शोध करू, पूर्वीचे लोकांनी शोध केला तो पक्का नाही. त्यातील चुका सर्व काढून आपली शास्त्रे शुद्ध करावी हे चांगले. मूर्खपणाने त्यासच चांगले म्हणून त्याचेच प्रतिपादन करावे हे नीट नाही, परंतु हे सांप्रतचे लोकांचे मनात येत नाही. (पृ. १३९)''.

संस्कृत विद्या (पान १४०) या पत्रात खालील मत देशमुखांनी व्यक्त केले आहे. 'संस्कृत विद्या निरुपयोगी व नाना प्रकारचे कुतर्क उत्पन्न करणारी व संसारावरील चित्त उडवून आळशी करणारी, व निरुपयोगी कामे करणारी आहे. सांप्रत काळी जे ज्ञान पाहिजे, ते त्यात मुळीच नाही. + + + + + तर आता ज्यास थोरपणा पाहिजे असेल, त्यांनी सांप्रत काळचे ज्ञानाची संपदा मिळविण्याचा प्रयत्न करावा. ज्या ज्ञानाने आपल्यावर इतर लोकांनी सरशी केली तें ज्ञान आपण धि:कारू नये; कारण की, त्याचा आपणास अनुभवच आला आहे (पृ. १४४)'.

संस्कृत विद्या (पान १५७) या पत्रात देशमुख लिहितात :- 'संस्कृतात यंत्रज्ञान नाही. + + + परंतु कोणी पंडिताने यंत्र कधी केले आहे ? यंत्राची सुधारणा केली आहे ? जे जाते व्यासाचे वेळेस होते, तेच आता आहे. जो नांगर पांडवांच्या राज्यात होता, तोच आता आहे. पंडितांनी कोणता ग्रंथ यंत्रावर विचार करून लिहिला आहे ? (पृ. १५९)'.

नमुन्यादाखल दिलेल्या वरील उताऱ्यांवरून महाराष्ट्राच्या उत्कर्षास्तव भौतिक शास्त्रीय ज्ञानाचे महत्त्व व उपयुक्तता यांची जाणीव देशमुखांना पूर्णपणे झाली होती व ते ज्ञान आपल्या लोकांनी संपादन केल्याखेरीज त्यांचा उद्धार व्हावयाचा नाही, ही गोष्ट त्यांस पटली होती, व हीच गोष्ट त्यांनी सर्व जनतेस सांगितली. हिंदू लोकांनी काय करावे (पान ३५५) याविषयी देशमुखांनी केलेल्या उपदेशांतील खालील महत्त्वाचा भाग आम्ही येथे देतो. पहिला उतारा हिंदू लोकांच्या राजकीय आकांक्षा व दुसरा उतारा हिंदुस्थानच्या भौतिक उत्कर्षास कारणीभूत होणाऱ्या भौतिक ज्ञानांतर्गत साधनांविषयीचा आहे.

'तेव्हा आमचे लोकांनी एकत्र होऊन पार्लमेंट मागावे, आणि मुंबई, कलकत्ता अशा ठिकाणी ते नेमून तेथे काही इंग्रज व आपले सर्व जातीचे शहाणे शहाणे लोक त्यात ठेवावे

आणि त्यांचे हुकुमाने कारभार करावा (पृ. ३५७)'.

'दुसरा तूर्त दरिद्र मोडण्यास उपाय असा आहे की, ब्राह्मण लोकांनी आपल्या मूर्खपणाच्या समजुती सोडाव्या आणि केवळ कारकून आणि भट हे दोनच रोजगार आम्ही करू असे म्हणू नये. या देशात आणखी पुष्कळ रोजगार आहेत व तेही आता इंग्रज घेत चालले. सावकारी, शेतकी वगैरे इंग्रज करू लागले. हेच रोजगार आपले लोकांनी करावे. कोणते म्हणाल तर, कांच, कापड, सुरी, कात्री, लाकडी सामान, घड्याळे, चाबूक, यंत्रे इत्यादी पुष्कळ इकडे इंग्रज खपवितात. ही सर्व आपले लोकांनी करावयास शिकावे व येथे जो माल खपणार नाही, तो दुसऱ्या देशास घेऊन जावा आणि तेथे विकावा. पुष्कळ देश आहेत या गोष्टीचा शोध करावा व इंग्रजांचे देशचे सामान बंद करावे, किंबहुना आपले सामान त्यांस द्यावे, परंतु त्यांचे आपण घेऊ नये. जो इकडे उत्पन्न होईल तितका माल घ्यावा. विलायती कापड घेऊ नये. यास्तव आपल्यास जाडी मोठी कापडे नेसावयास लागली तर काय चिंता आहे ? परंतु आपले देशाचे रक्षण करावे. असे झाले म्हणजे बहुत रोजगार राहातील (पृ. ३५७)'. देशमुखांच्या पश्चात आजतागायत महाराष्ट्रात ज्या राजकीय, औद्योगिक, व्यापारिक घडामोडी सुरू आहेत त्यांच्या बीजांचे साग्र दिग्दर्शन त्यांनी या उताऱ्यात उत्कृष्टप्रकारे थोडक्यात केले आहे. गोपाळराव देशमुखांचा जन्म इ. स. १८२३ सालांत झाला व त्यांचें निधन इ. स. १८९२ सालांत झाले. ही पत्रे इ. स. १८४८ ते १८५० या दोन वर्षांत मुंबईच्या 'प्रभाकर' या नावाच्या साप्ताहिकात त्यांच्या वयाच्या २५-२६ वर्षांचे सुमारास वाई येथे इ. स. १८५२ साली मुनसफ म्हणून त्यांची नेमणूक होण्यापूर्वी त्यांनी प्रसिद्ध केली. यावरून इ. स. १८५० सालाचे सुमारास महाराष्ट्राची विद्यमान स्थिती व त्याचे भवितव्य यांविषयी विचार करण्याची मनोवृत्ती पाश्चात्त्य इंग्रजी शिक्षण घेतलेल्या तरुण महाराष्ट्रीयात उत्पन्न झाली होती असे दिसून येते. येथपावेतो केलेल्या विवेचनावरून इ. स. १८१८ पासून इ. स. १८७० पावेतो निकृष्ट प्रकारच्या अध्यात्मज्ञानापलीकडे श्रेष्ठ प्रतीच्या भौतिक शास्त्रीय ज्ञानाचा उदय महाराष्ट्रात झाला नव्हता. सर्वत्र गाढ अज्ञान व अंध:कार पसरलेला होता. महाराष्ट्राचे राजकीय नेते म्हणून पुढे प्रसिद्धी पावलेले दादाभाई नौरोजी यांचा जन्म इ. स. १८२५ सालांत होऊन मृत्यू इ. स. १९१७ सालांत झाला. इंग्रजी भाषा व पाश्चात्त्य विद्या यांत दादाभाई यांनी असामान्य प्रावीण्य संपादन केले होते. इ. स. १८७० सालांत बडोदे संस्थानची दिवाणगिरी सोडून हिंदुस्थानची राजकीय गाऱ्हाणी ब्रिटिश राष्ट्राच्या

वेशीवर टांगण्याकरिता ते विलायतेस गेले. तेथे अनेक वर्षे वास्तव्य करून फिन्सबरी परगण्याचे प्रतिनिधी म्हणून ते इंग्लिश पार्लमेंटचे सभासद निवडून आले. भरतखंडाच्या आर्थिक स्थितीचे त्यांनी सूक्ष्म अवलोकन करून भरतखंडाच्या दारिद्र्याची उत्कृष्ट मीमांसा त्यांनी केली. हिंदुस्थानच्या दारिद्र्याचे मुख्य कारण इंग्रजी राजसत्ता आहे हा सिद्धांत त्यांनी प्रस्थापित केला. भरतखंडाचे राष्ट्रीय चारित्र्य संपूर्ण स्वातंत्र्य व स्वराज्ययुक्त करण्याच्या दृष्टीने पार्लमेंटचे सभासद या नात्याने त्यांनी अनेक हालचाली केल्या व याविषयीचे वाङ्मय इंग्रजी भाषेत निर्माण केले. त्यांनी आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात इ. स. १९०६ साली कलकत्ता येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेत भरतखंडास जी अनेक दु:खे व आपत्ती भोगाव्या लागत आहेत; त्यातून त्याची मुक्तता त्याजला स्वराज्य प्राप्त झाल्याखेरीज होणार नाही हा निश्चित सिद्धांत आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी पुकारला. दादाभाईंनी केलेल्या कार्याचे जे थोडक्यात वर वर्णन केले आहे त्यावरून भौतिक शास्त्रीय ज्ञानविचाराची महती त्यांना वाटली नसावी. त्यांचे विलायतेस वास्तव्य वीसपंचवीस वर्षे होते. इंग्रजांचा व त्यांचा इतका निकट सहवास झाला असून इंग्रजांची भरतखंडावरील राजकीय सत्ता त्यांच्या भौतिक व शास्त्रीय ज्ञानामुळे त्यास प्राप्त झाली आहे या गोष्टीची प्रखर जाणीव त्यांना झाल्याचे त्यांच्या विचारप्रदर्शनावरून दिसून येत नाही. दादाभाईंना ही जाणीव न झाल्यामुळे अर्थातच त्यांनी हे श्रेष्ठत्व कोणत्या साधनांनी प्राप्त करून घ्यावे याविषयी मनात भरण्यासारखी चर्चा त्यांनी कोठे केल्याचे आढळत नाही. ब्रिटिश लोक न्यायी वृत्तीचे आहेत, हिंदुस्थानच्या लोकांची राजकीय गाऱ्हाणी त्यांना पूर्णपणे विदित नाहीत, अशी दादाभाईंची दृढ समजूत असून या गोष्टींची जाणीव इंग्लंडांतील इंग्रजांस करून दिली तर इंग्रज लोक स्वखुषीने हिंदुस्थानास स्वराज्य देतील असा विश्वास दादाभाईंना वाटत असे.

इ. स. १८७० सालाचे सुमारास महाराष्ट्राच्या वैचारिक वातावरणांत क्रांती घडवून आणणारे एक नवीन युग अवतीर्ण झाले. या सालापासून प्रस्तुत काळापावेतोच्या महाराष्ट्रीय समाजाच्या वैचारिक स्थितीत कोणत्या प्रकारची स्थित्यंतरे घडत गेली, ती घडून येण्यास कोणकोणती कारणे झाली, भौतिक शास्त्रीय ज्ञानाच्या महत्त्वाची जाणीव महाराष्ट्रीय जनतेस कोणत्या प्रमाणात झाली व ते साध्य करण्याचे प्रयत्न कितपत झाले व या प्रयत्नांचे प्रत्यक्ष फल महाराष्ट्रीय जनतेने कितपत मिळविले, या विषयीचे विवेचन व दिग्दर्शन यापुढे आम्ही करतो.

प्रस्तुत नमूद केलेल्या मुद्दयाच्या दृष्टीने पहिली अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे इ. स. १८५७ सालांत मुंबई विश्वविद्यालयाची स्थापना ही होय. या विश्वविद्यालयाच्या स्थापनेचे योगाने इंग्रजी शिक्षण घेणाऱ्या महाराष्ट्रीय तरुण पिढीतील लोकांच्या वैचारिक मनोरचनेत स्थित्यंतर घडवून आणणाऱ्या कारणांचे बीजारोपण केले गेले. मानवी प्राण्याच्या या भूतलावरील वास्तव्यात भौतिक शास्त्रीय ज्ञान व ते साध्य करण्यास्तव युक्त उपायांचे अवलंबन करणे हेच महाराष्ट्राच्या उन्नतीचे मुख्य साधन आहे याची जाणीव महाराष्ट्रीय समाजात उदयास येण्यास प्रारंभ झाला. प्रपंच हा नश्वर व असार आहे, त्याचेकडे विशेष लक्ष देण्याचे कारण नाही, ही पूर्वापार चालत आलेली मनोरचना पोकळ असून हा निकारक आहे याची अंधुक जाणीव उदयास येण्यास प्रारंभ झाला. मुंबई विश्वविद्यालयाची स्थापना होताच त्या विद्यालयाच्या उच्च परीक्षांत उत्तीर्ण होऊन श्रेष्ठ पदव्या संपादन करणाऱ्या पदवीधरांत न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे व डॉक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे दोन नामांकित विद्वान उदयास आले व महाराष्ट्रीय समाजाचे वैचारिक नेतृत्व त्यांचेकडे आले. या दोन विद्वानांपैकी महादेव गोविंद रानडे यांचे लक्ष महाराष्ट्राचे पूर्वचरित्र व त्याचा इतिहास, महाराष्ट्राची सद्य:स्थिति व महाराष्ट्राच्या भावी उत्कर्षास्तव युक्त उपायांचे चिंतन या गोष्टींकडे तीव्रपणे वेधले गेले. या गोष्टींचा सूक्ष्म विचार करण्यास लागणारी कुशाग्र, व्यापक व श्रेष्ठ प्रकारची बुद्धिमत्ता रानड्यांपाशी होती. अनेक वर्षे अभ्यास करून रानड्यांची यांविषयांची जी मते निश्चित झाली ती त्यांनी लिहिलेल्या अनेक लेखांत व ग्रंथांत व्यक्त केली आहेत. रानड्यांची बुद्धिमत्ता व विद्याव्यासंग देशमुखांपेक्षा श्रेष्ठ प्रतीचा होता. अर्थात् रानड्यांचे या मुद्दयासंबंधाचे विचारप्रदर्शन व भरतखंडाच्या उदयाच्या युक्तमार्गाविषयीचे विवेचन व्यापक व भरीव असून श्रेष्ठ प्रतीचे आहे. अध्यात्मज्ञानासंबंधीं चिंतन करून महाराष्ट्रांत प्रचलित असलेल्या पूर्वापार अध्यात्मज्ञानाची नूतन कालपरिस्थितीस अनुसरून नूतन पद्धतीने मांडणी करण्याची आवश्यकता रानड्यांस भासली. बंगाल प्रांतात स्थापन झालेल्या ब्राह्मोसमाजाच्या तत्त्वांनुसार मुंबई इलाख्यात प्रार्थनासमाज या नावाचा जो नूतन सांप्रदाय इ. स. १८६७ सालात स्थापन करण्यात आला त्यांत रानड्यांनी प्रमुख भाग घेतला. Christianity in America, Government and Idolatry व Christians in Bomaby हे रानड्यांचे धर्मविषयक तीन लेख १८६३ चे नाताळात इंदुप्रकाशात प्रसिद्ध झाले. या त्यांच्या लेखांवरून प्रार्थनासमाजासारखा सांप्रदाय स्थापण्याची आवश्यकता त्यांना

भासू लागल्याचे दिसते. धर्मांतरास्तव मिशनरी लोकांनी चालविलेल्या खटपटीचे बाबतीत श्री. दिनशा वाछा यांनी आपला अभिप्राय खालीलप्रमाणे व्यक्त केला आहे.

It must be confessed that the missionaries failed almost in their fundamental object of proselytising. India even after half a century of Universities and Colleges remains, valiantly faithful to her old immemorial faith, however, encrusted in the degraded superstitions. The spiritualisam of the land is as firm as a rock to day as it was in the days of Buddha and Asoka, though modified with the envioronments of modern civilisation with which she is surrounded."

(श्री. वा. वा. ठाकूरकृत रानड्यांचें मराठी चरित्र पा. ६५)

वरील उताऱ्यातील शेवटच्या वाक्यातील आशयानुसार प्रार्थनासमाजाची प्रमुख तत्त्वें निर्गुण निराकार सर्वव्यापी सर्वशक्तिमान परमेश्वराचे अस्तित्व, मूर्तिपूजानिषेध, परमेश्वराच्या कृपेस्तव त्याची प्रार्थना करणे हा एकच मार्ग व जातिभेदाचे अमान्यत्व ही या समाजाची तत्त्वें ठरली गेली. रानड्यांच्या पूर्ववयांत प्रार्थना समाजाच्या स्थापनेत जरी त्यांनी प्रमुखपणा घेतला होता तथापि त्यांच्या उत्तरवयात मुंबई हायकोर्टाच्या न्यायाधीशाच्या जागेवर त्यांची नेमणूक झाल्यावर त्यांच्या धार्मिक मतांत परिवर्तन होऊन भागवतधर्म ऊर्फ वारकरी सांप्रदायाची तत्त्वे व त्या सांप्रदायाच्या ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ इत्यादी संतांनी प्रतिपादन केलेली व प्रसृत केलेली तत्त्वे त्यांना मान्य झाली होती, असें त्यांच्या 'धर्मपर व्याख्याने' या ग्रंथावरून दिसून येते. वारकरी संतांच्या शिकवणीविषयी त्यांना जसा प्रेमादर वाटत होता त्याचप्रमाणे समर्थ रामदासांच्या शिकवणीविषयीही त्यांना प्रेमादर वाटत होता, असे रामदासांवर त्यांनी दिलेल्या व्याख्यानावरून दिसून येते. आता दर्शविलेल्या या घटनेशिवाय महाराष्ट्रीय समाजाच्या अध्यात्मज्ञानात म्हणण्यासारखी महत्त्वाची घडामोड झाली नाही. सुरुवातीपासूनच प्रार्थनासमाजाच्या मुंबई इलाख्यातील अनुयायांची संख्या पांचशेवर कधीच गेली नाही व रानड्यांची वरील व्याख्याने ज्या काळी झाली त्या काळी ही संख्या घटत घटत पन्नास पाऊणशेवर आली. प्रार्थनासमाजाची स्थापना इ. स. १८६७ सालांत झाल्यापासून इ. स. १८९६-९७ सालापावेतो महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनता पूर्वापार चालत आलेल्या अध्यात्मज्ञानास चिकटून होती.

आता रानड्यांसारख्या महाराष्ट्रीय समाजाच्या ज्ञात्या व विचारी नेत्याची भौतिक शास्त्रीय ज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांच्या ज्ञानाचा प्रसार महाराष्ट्राचा उद्धार होण्यास्तव

करण्याची महती व आवश्यकता याविषयींची त्यांची मते कोणत्या प्रकारची होती याचे आम्ही थोडक्यात दिग्दर्शन करतो. महाराष्ट्रीयांवर राज्य करणारे इंग्रज व महाराष्ट्रीय लोक यांच्या गुणदोषांची रानड्यांनी उत्तम परीक्षा केली होती. भौतिक ज्ञानांतर्गत अनेक शास्त्रीय शाखांच्या ज्ञानाची महाराष्ट्रीयांपेक्षा इंग्रजांची श्रेष्ठता रानड्यांस ज्ञात होती; व आपल्या लोकांची सर्वांगीण प्रगती झाली पाहिजे असा रानड्यांचा निश्चित सिद्धांत होता. या सिद्धांतास अनुसरून रानड्यांनी राष्ट्रीय उन्नतीच्या ज्या अनेक शाखा आहेत त्यांविषयी अभ्यासपूर्वक बहुमोल वाङ्मय निर्माण केले, व राष्ट्राच्या अभ्युदयास्तव देशांत अनेक हालचाली सुरू करून त्यांची जोपासना केली. भौतिक शास्त्रीय ज्ञानाचे संपादन आपल्या देशांतील तरुणांनी करून त्या ज्ञानाचा उपयोग देशांतील उद्योगधंदे व कारखाने यांच्या अभिवृद्धीसाठी करावा या बाबतीत रानड्यांच्या कल्पना निश्चित स्वरूपाच्या बनल्या होत्या, असे पुण्याच्या सार्वजनिक सभेने इ. स. १८८० सालाचे सुमारास एतद्देशीय संस्थानिक, सरदार व व्यापारी मंडळीस उद्देशून काढलेल्या विनंतिपत्रावरून दिसून येते. (श्री. वासुदेव वामन ठाकूर यांनी लिहिलेले रानडेचरित्र पान १७४ ते १८१ पाहा). हे पत्र जरी सार्वजनिक सभेच्या नावाने प्रसिद्ध झाले तथापि रानडे हेच या पत्राचे जनक होते.+

जपान्यांनी स्वदेशाचे उत्कर्षास्तव जो मार्ग आक्रमिला तोच मार्ग हुबेहूब या विनंतिपत्रांत रानड्यांनीं नमूद केला आहे. या पत्रास हिंदुस्थान सरकारने केराची टोपली दाखविली

---

+ प्रस्तुतचें महायुद्ध सुरू होऊन पांच वर्षे झाल्यानंतर चालू सालीं हिंदुस्तान सरकारानें दरसाल पांचशें विद्यार्थी निरनिराळ्या भौतिक शास्त्रांच्या शाखांचा अभ्यास करण्यांकरितां सरकारी खर्चानें इंग्लंड आणि अमेरिका या देशांतील विश्वविद्यालयांत पाठविण्याची योजना जाहीर केली आहे व त्या योजनेअन्वयें विद्यार्थ्यांची निवड लवकरच व्हावयाची आहे. वर नमूद केलेल्या सार्वजनिक सभेच्या पत्रकांत हिंदुस्तान सरकारास उदारपणाचा उमाळा येऊन नऊ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देऊन परदेशांत भौतिक शास्त्रीय ज्ञान मिळविण्याकरितां पाठविण्याची योजना त्यांचेकडून इ. स. १८७० सालीं जाहीर केली गेली होती; परंतु या नाहीं त्या कारणाकरितां ती अमलांत न येतां ढांसळून पडली, असें वरील पत्रांत नमूद केलें आहे. ते वेळीं जो प्रकार घडला तो आतां नमूद केलेल्या योजनेबाबत घडूं नये अशी उमेद हिंदी लोकांनीं बाळगावी. न्या. रानड्यांस ज्या गोष्टीची आवश्यकता सुमारें ७५ वर्षांपूर्वी भासली त्या गोष्टीची आवश्यकता इंग्रज सरकारासही ते वेळीं भासली होती, परंतु तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. प्रस्तुतच्या महायुद्धामुळें उपस्थित झालेल्या परिस्थितींत इंग्रजांच्या स्वार्थाच्या दृष्टीनें ही गोष्ट अत्यंत अवश्य झाली आहे व म्हणूनच वरील योजना तत्काल अमलांत येईल असें वाटतें. प्रत्यक्ष काय घडेल तें खरें.

असावी. कारण त्यांत नमूद केलेली कोणतीच गोष्ट घडून आली नाही. यात नवल करण्यासारखे काहीच नाही. कारण या पत्रांतील गोष्टी करण्याने इंग्रजांस हिंदुस्थानापासून होणारा लाभ कायमचा संपुष्टात येणार होता !

भौतिक शास्त्रीयज्ञानविचारांत अंतर्भूत होणाऱ्या राष्ट्रीय प्रपंचाच्या - राष्ट्राचे संपूर्ण स्वातंत्र्ययुक्त स्वराज्याच्या - उत्कर्षास कारणीभूत होणारी इ. स. १८८६ सालांत राष्ट्रीय सभा या नावाची एक नूतन संस्था मुंबई शहरात स्थापन करण्यात आली. ही संस्था हिंदी राष्ट्राच्या ज्या विचारवंत पुढाऱ्यांनी स्थापिली त्यांपैकी रानडे हे एक प्रमुख होते. प्रारंभी या संस्थेचे ध्येय अगदी आकुंचित होते. देशाचा राज्यकारभार चांगल्या प्रकारे चालविण्याकरिता सरकाराकडून ज्या वरिष्ठ नोकऱ्यांवर इंग्रजांची नेमणूक केली जाते त्या नोकऱ्यांवर हिंदी लोकांच्या नेमणुकी करण्यात याव्या व याशिवाय हिंदी प्रजेस जाचक होणाऱ्या करांबाबत सरकारने उदार धोरण स्वीकारावे अशा प्रकारचे होते. हे धोरण कालांतराने विस्तृत होता होता संपूर्ण स्वातंत्र्य व स्वराज्य हिंदी जनतेने प्राप्त करून घ्यावे हे या संस्थेचे ध्येय बनले गेले. ही संस्था स्थापन करणाऱ्या आद्य विचारी हिंदी नेत्यांस ज्या एका महत्त्वाच्या बाबीची जाणीव व्हावयास पाहिजे होती, परंतु ती झाली नाही; ती म्हणजे कोणत्याही राष्ट्राचा प्रपंच सुखदायी व वैभवशाली होण्यास सर्वस्वी भौतिक शास्त्रीय ज्ञान कारणीभूत होत असते ही होय. यामुळे राष्ट्रोद्धाराच्या खऱ्या व परिणामकारक मार्गाकडे राष्ट्रोद्धाराचा गाडा हांकला गेला नाही. स्वातंत्र्याच्या व स्वराज्याच्या कल्पना हिंदुजनतेत प्रसार करण्याच्या गौण व कनिष्ठ मार्गाने हा गाडा हांकलण्यास प्रारंभ करून त्याच मार्गाने आजपावेतो तो हांकलला जात आहे. याचा परिणाम असा झाला आहे की, पन्नासपंचावन्न वर्षे या संस्थेची अधिवेशने भरत असून या संस्थेच्या स्थापनेचे वेळेस स्वराज्य जितके दूर होते तितकेच आजतागायत दूर आहे! या संस्थेची ध्येय साध्य करणेची जी साधने ठरली होती त्यांत काही वर्षांपूर्वी एक मोठी क्रांती घडून आली. ती क्रांती म्हणजे अनत्याचारी असहकारिता व कायदेभंग ही स्वराज्य व स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याची साधने म्हणून या संस्थेकडून मान्य केली गेली ही होय. या साधनांचा गेल्या वीसबावीस वर्षांत जोराने उपयोग केला जात आहे. हजारो हिंदी देशभक्त तुरुंगांत जात आहेत, व सुटत आहेत. या खेळाची गेल्या वीसबावीस वर्षांत दोनतीन वेळा पुनरावृत्ती झाली, परंतु संपूर्ण स्वातंत्र्य व पूर्ण स्वराज्याचा गाडा ज्या स्थळी थबकून पडला होता तेथेच तो पडून राहिला आहे. राष्ट्रीय सभेचे ध्येय व ते साध्य करण्याची साधने या बाबतीत हिंदी लोकांनी केलेल्या खटपटी यांच्यापासून फलनिष्पत्ती

म्हणण्यासारखी काही होत नाही, असा साक्षात अनुभव हिंदी राष्ट्राच्या नेत्यांस आला असूनही राष्ट्रोद्धाराच्या अन्य साधनांचा आश्रय करून त्याचा पुरस्कार करण्यास हिंदी पुढारी तयार नाहीत. प्रस्तुतच्या महायुद्धात सामील असलेल्या निरनिराळ्या राष्ट्रांनी विजय मिळविण्यास्तव जी जी साधने उपयोगांत आणिली आहेत त्या त्या साधनांपैकी एकही साधन स्वतंत्रपणे इंग्रजांच्या साहाय्यावांचून निर्माण करण्याची बुद्धी व ऐपत हिंदी राष्ट्रांत नाही. ही गोष्ट हिंदी राष्ट्राच्या विचारी नेत्यांच्या साक्षात् प्रत्ययास येत असता या पुढाऱ्यांचे लक्ष अनत्याचारी अहिंसेशिवाय राष्ट्रोद्धाराच्या अन्य कोणत्याच प्रकारचीं साधनें अस्तित्वात आणून त्यांची जोपासना करण्याकडे वेधले जात नाही, हे हिंदी राष्ट्राचे एक मोठे दुर्दैव समजलं पाहिजे !

राष्ट्रीय सभेच्या स्थापनेचे वेळी धूर्त इंग्रज राज्यकर्त्यांनी राष्ट्रीय सभेच्या ध्येयाविषयी सहानुभूती दाखविली व प्रथम काही वर्षे तिच्या ध्येयास प्रोत्साहन दिले. असे करण्यात त्यांचा आपमतलबीपणाचा डाव होता. हा डाव म्हणजे हिंदी राष्ट्राच्या उद्धाराच्या दृष्टीने जो परिणामकारक मार्ग होता त्याकडे त्यांचे लक्ष न जाऊ देता भलत्याच मार्गाचे त्यांनी आक्रमण करीत राहावे, व त्यांची बुद्धी काळ व द्रव्य यांचा भलत्याच गोष्टी करण्यात खर्च व्हावा हा होय. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेत प्रमुख भाग घेणाऱ्या रानड्यांनी वर नमूद केलेल्या विनंतिपत्रात जो भरीव कार्यक्रम नमूद केला आहे त्यास त्यांनी अग्रस्थान देऊन तो यशस्वी करण्याचा प्रयत्न केला असता तर हिंदी लोकांचे पूर्ण स्वातंत्र्य व पूर्ण स्वराज्य हे जे राष्ट्रीय ध्येय ते यापूर्वीच सिद्धीस जाण्याचा फार मोठा संभव होता.

महाराष्ट्रांत राष्ट्रोद्धाराचा विचार करून त्याच्या सिद्धीचे चिंतन करणाऱ्या रानड्यांसारख्या विचारी पुढाऱ्यांच्या हयातीत कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे एक नामांकित राष्ट्रोद्धाराचे चिंतन करणारे विचारी नेते झाले. त्यांनी प्रसृत केलेली विचारप्रणाली व ती साध्य करण्यास्तव त्यांनी अवलंबिलेली साधने यांविषयीची आम्ही येथे अल्प चर्चा करतो.

विष्णुशास्त्र्यांच्या उदयापूर्वी गोपाळराव हरी देशमुख उदयास आले होते. मागे नमूद केल्याप्रमाणे ते राष्ट्रोद्धाराचे चिंतन करणारे विचारी नेते होते, परंतु त्यांच्या लेखांचा परिणाम महाराष्ट्रीय जनतेवर बऱ्या प्रकारचा झाला नाही. स्वराष्ट्र, स्वसंस्कृति, स्वविद्या, स्वजनं यांची त्यांनी आपल्या लेखांत केलेली निंदा व इंग्रज राज्यकर्त्यांचे त्यांनी आपल्या लेखांत केलेले ओतप्रोत गुणगान यांचा महाराष्ट्रीय समाजांतील सुशिक्षित जनतेस तिटकारा आला. त्यांच्या लेखांमुळे स्वराष्ट्राच्या उद्धाराविषयी जे निराशेचे मानसिक वातावरण निर्माण झाले होते त्याची प्रतिक्रिया विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी आपल्या प्रभावी

लेखमालेने सुरू केली. शास्त्रीबोवांनी निबंधमाला या नावाचे एक मासिक सुरू केले, महाराष्ट्राचे भूतकालीन वैभवी चरित्र, आपल्या पूर्वजांचा उज्ज्वल इतिहास, पूर्वकालीन संस्कृत विद्या, स्वधर्म व स्वसंस्कृती इत्यादिकांचे यथातथ्य वर्णन विष्णुशास्त्र्यांनी परिणामकारक लेखांत व्यक्त करून गोपाळराव हरी देशमुख यांनी उत्पन्न केलेल्या निराशेच्या वातावरणाचा विध्वंस केला. याशिवाय मराठ्यांच्या इतिहासाच्या बखरी, अस्सल ऐतिहासिक पत्रें व मराठी भाषेतील कवींनी केलेले नामांकित काव्यग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याकरितां 'काव्येतिहाससंग्रह' नावाचे मासिक पुस्तक त्यांनी सुरू केले. महाराष्ट्रातील पुरातन चित्रकलेचे उत्कृष्ट नमुने म्हणजे देवादिकांची चित्रे छापून त्याचा प्रसार महाराष्ट्रीय जनतेत करण्याकरिता त्यांनी चित्रशाळा छापखाना सुरू केला. महाराष्ट्रातील गोंधळी लोकांचे तोंडी गतकालीन ऐतिहासिक व्यक्ति व ऐतिहासिक प्रसंग यांच्या वर्णनपर पोवाडे असत. ते उतरून काढून एकत्रित करण्याची कामगिरी रा. शाळिग्राम या नावाच्या त्यांच्या स्नेह्यास त्यांनी सांगितली. गोंधळ्यांचे हे पोवाडे राष्ट्राभिमान व वीरवृत्ती महाराष्ट्रांतील तरुणांत उत्पन्न करण्यास कारणीभूत झाले. शास्त्रीबोवांच्या निबंधमालेतील इतिहासावरील निबंध अत्यंत परिणामकारक व स्वाभिमान उत्पन्न करणारा आहे. सर्वसामान्य महाराष्ट्रीय जनतेस प्रचलित राजकारणाचे ज्ञान व्हावे या हेतूने शास्त्रीबोवांनी 'केसरी' वर्तमानपत्र मराठीत व 'मराठा' वर्तमानपत्र इंग्रजीत सुरू केले. या दोन्ही वर्तमानपत्रांनी शास्त्रीबोवांनी ठरविलेले ध्येय उत्तमप्रकारे साध्य केले आहे. विष्णुशास्त्र्यांचे हे सर्व कार्य भौतिकशास्त्रज्ञानविचारांत अंतर्भूत होणारे असे होते. याशिवाय विष्णुशास्त्र्यांचे राष्ट्रीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे कार्य म्हणजे न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना हे होय. इंग्रजांची गुलामगिरी करणारे कारकून निर्माण करणारे शिक्षण महाराष्ट्रातील तरुणांस देणे हे या संस्थेची स्थापना करण्यात शास्त्रीबोवांचे ध्येय नव्हते. महाराष्ट्राचा उद्धार करण्यास्तव ज्या श्रेष्ठ प्रतीच्या ज्ञानाची आवश्यकता होती, ते ज्ञान महाराष्ट्रांतील तरुणास देणे हे या संस्थेचे ध्येय शास्त्रीबोवांनी ठरविले होते, परंतु शास्त्रीबोवांच्या अकाली मृत्यूमुळे व महाराष्ट्राच्या दुर्दैवामुळे पुढे हे ध्येय बाजूस पडून इंग्रजांची कारकुनी करणारे लोक निर्माण करणारीच ही संस्था बनली. निबंधमाला समाप्त करण्यापूर्वी शास्त्रीबोवांनी 'आमच्या देशाची स्थिती' या नावाचा एक निबंध छापून प्रसिद्ध केला (प्रस्तुत तो सरकारजमा झाला आहे). या निबंधात भरतखंडाच्या उत्कर्षास्तव कोणत्या मार्गाचे अवलंबन केले पाहिजे याचे मार्मिक विवेचन शास्त्रीबोवांनी केले आहे.

महाराष्ट्राच्या अध्यात्म ज्ञानविचारांचे बाबतीत शास्त्रीबोवांनी त्या काळी मुंबईचा

प्रार्थनासमाज, दयानंदसरस्वतींचा आर्यसमाज, जोतिबा फुले यांनी हिंदुधर्मावर ओढलेले कोरडे, यांविषयी प्रतिकूल टीका केलेली आहे. या टीकेपलीकडे अध्यात्मज्ञान-विचारांविषयी त्यांनी अधिक विचारप्रदर्शन आपल्या लेखात कोठे केलेले नाही.

विष्णुशास्त्र्यांनीं केलेल्या विचारप्रदर्शनाचे निरीक्षण केले असता भौतिक शास्त्रीय ज्ञानाची उणीव आपल्या लोकांत फार मोठ्या प्रमाणात असून ती नाहीशी केल्याविना भरतखंडाचा उद्धार व्हावयाचा नाही या गोष्टीची प्रखर जाणीव व या जाणिवेमुळे ही उणीव भरून काढण्याकरिता उपयुक्त उपायांचे चिंतन या विषयीचे विचार त्यांच्या लेखांत आढळून येत नाहीत.

शास्त्रीबोवांचे पश्चात झालेले महाराष्ट्राचे नामांकित विचारवंत नेते म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे होत. शास्त्रीबोवांनी केसरी व मराठा वर्तमानपत्रे ज्या ध्येयास्तव काढली होती ते ध्येय लोकमान्यांनी उत्कृष्टपणे साध्य केले. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' या सूत्रवाक्याचा प्रसार भरतखंडांतील कानाकोपऱ्यांत राहणाऱ्या जनतेत त्यांनी या वर्तमानपत्राचे द्वारे केला. ही लोकमान्यांची कामगिरी नि:संशय फार श्रेष्ठ दर्जाची व परिणामकारक झाली, परंतु भरतखंडाच्या राष्ट्रोद्धाराच्या प्रश्नाबाबत लोकमान्यांनी केलेल्या विचारप्रदर्शनात भौतिक शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीवर भरतखंडाचा उद्धार सर्वस्वीं अवलंबून आहे असे मत त्यांनी प्रतिपादिल्याचे कोठे आढळत नाही. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीयशिक्षण ही स्वराज्याची साधने आहेत, अशा प्रकारचे प्रतिपादन टिळकांनी केसरीचे द्वारे जोरदार रीतीने केल्याचे आढळते. यापलीकडे लोकमान्यांनी या बाबतीत अधिक काही केल्याचे आढळत नाही. स्वराज्याच्या कल्पनेचा प्रसार व पुरस्कार करण्याकरिता शिवाजी उत्सव करण्याची प्रथा लो. टिळकांनी सुरू केली, व ती महाराष्ट्रात व भरतखंडाच्या अन्य प्रांतात प्रसार पावली. भौतिक शास्त्रीय विचारात अंतर्भूत होणारी वरील गौण कार्ये टिळकांनी केली.

आता अध्यात्मज्ञानविचारांचे बाबतीत टिळकांनी त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या महाराष्ट्राच्या विचारी नेत्यांपैकी कोणीही न केलेली कामगिरी केली. ही कामगिरी म्हटली म्हणजे 'गीतारहस्य' या ग्रंथाची रचना व प्रसार ही होय. या ग्रंथाचा मुख्य सिद्धांत आत्मसाक्षात्कार झालेल्या ज्ञानी पुरुषास इहलोकी त्याचे वास्तव्य आहे तोपावेतो कर्म करणे सुटत नाही व त्याने कर्म करीत राहावे हेच युक्त आहे. या ग्रंथाची भरतखंडांतील अनेक भाषांत भाषांतरे झाली असून हा ग्रंथ लोकप्रिय झाला आहे. महाराष्ट्राचे विचारवंत नेते व धुरीण या नात्याने टिळकांनी केलेल्या कार्याचे स्वरूप या प्रकारचे आहे.

टिळकांप्रमाणे कै. गोपाळराव गोखले हेही महाराष्ट्राचे एक विचारवंत नेते होते. अध्यात्मज्ञानविचारांकडे यांचे लक्ष नव्हते. भौतिक शास्त्रविचारांचे अंतिम फल जे - राष्ट्रीय प्रपंच संपूर्ण स्वातंत्र्य व स्वराज्य यांनी युक्त करावयाचा - ते प्राप्त करण्याचा त्यांनी अहर्निशी प्रयत्न केला व हे कार्य सतत चालू ठेवणारे नि:स्वार्थी देशभक्त देशात निर्माण व्हावे या हेतूनें 'भारतसेवकसमाज' (Servant of India society) या नावाची संस्था त्यांनी स्थापन केली. गोखले हे रानड्यांचे शिष्य होते, व रानड्यांप्रमाणे आपल्या देशाची सर्वांगीण प्रगती व सुधारणा झाली पाहिजे असे त्यांचे मत होते, पण भौतिक शास्त्रीयज्ञानाची आपल्या राष्ट्रात अत्यंत आवश्यकता आहे व हे ज्ञान पाश्चात्त्य राष्ट्रांतील लोकांच्या बरोबरीने आपल्या लोकांनी प्राप्त करून घेतल्याशिवाय त्यांना स्वातंत्र्य व स्वराज्य प्राप्त व्हावयाचे नाही अशा प्रकारचे निश्चित मत त्यांच्या विचारप्रदर्शनात कोठे आढळून येत नाही.

छत्रपती शिवाजीमहाराजांपासून तो मराठ्यांच्या स्वातंत्र्याचा व स्वराज्याचा लय इ. स. १८१८ सालात होईतोपर्यंत व इ. स. १८१८ पासून इ. स. १९०० सालापावेतो महाराष्ट्रातील अध्यात्मज्ञानविचार व भौतिक शास्त्रीय ज्ञानविचार कोणत्या स्वरूपात निरनिराळ्या काळी अस्तित्वात होते व त्यात कोणकोणती स्थित्यंतरे होत गेली याचे यथातथ्य दिग्दर्शन आम्ही येथवर केले आहे. इ. स. १८८० ते १९०० या कालविभागाच्या उत्तरार्धात राजवाडे महाराष्ट्रीय समाजात इतिहासंशोधक म्हणून उदयास आले. त्यांनी या दोन विचारसंप्रदायासंबंधी चिंतन करून आपली मते निश्चित ठरविली होती.

महाराष्ट्रीय समाजाचे विचारी नेते या नात्याने इ. स. १३०० ते इ. स. १९०० पावेतो जे पुरुष आतापावेतो केलेल्या विवेचनात आम्ही नमूद केले त्यांत राजवाड्यांचे स्थान कोणते हे त्यांनी निर्मिलेल्या वाङ्मयांतील विचारप्रदर्शनावरून प्रस्तुत स्थळी आम्ही थोडक्यात दर्शवितो.

प्रथम अध्यात्मज्ञानविचाराविषयी राजवाड्यांनी कोणत्या प्रकारचे विचारप्रदर्शन केले हे आम्ही नमूद करतो. राजवाड्यांनी निर्माण केलेल्या विस्तृत वाङ्मयांत अध्यात्मज्ञानाविषयी स्वत:चे विचार म्हणण्यासारखे कोठेच नमूद केले नाहीत. एकनाथपूर्वकालीन जी ज्ञानेश्वरी त्यांनीं छापून प्रसिद्ध केली तीस एक विस्तृत प्रस्तावना त्यांनी जोडली आहे. या ज्ञानेश्वरी ग्रंथातील विषय अध्यात्मज्ञान विचारांविषयीचा आहे, तथापि या ग्रंथाच्या या मुख्य विषयासंबंधी त्यांनी या ग्रंथाच्या प्रस्तावनेत कांहीएक विचार प्रदर्शित केलेले नाहीत. ही गोष्ट या प्रस्तावनेच्या खालील समाप्तीच्या वाक्यावरून

दिसून येते. 'ज्ञानेश्वरांचे चरित्र, नाथपंथाची हकीकत, ज्ञानेश्वराचा वेदान्त, भक्तिमार्गाच्या अनादिसिद्ध व ऐतिहासिक परंपरेचे वर्णन वगैरे अनेक विषयांवर बहुत विवेचन करण्यासारखे आहे. ते, ज्ञानेश्वरांचे इतर अस्सल जुने ग्रंथ मिळून छापण्याचा योग आल्यास, यथावकाश करतां येईल'. (ज्ञानेश्वरीची प्रस्तावना पृ. १०६)

या वाक्यात दर्शविल्याप्रमाणे या ग्रंथाच्या प्रसिद्धीनंतर त्यांच्या निधनापावेतो त्यांनी त्यांचे या विषयासंबंधाचे विचार विस्तृतपणे कोठेच प्रसिद्ध केले नाहीत. नाही म्हणावयास आहिताग्नि शंकरराव राजवाडे यांचे गीताभाष्य, त्याचप्रमाणे लोकमान्य टिळकांचे गीतारहस्य या ग्रंथांच्या परीक्षणात याविषयीचे किंचित मतप्रदर्शन राजवाड्यांनी केलेले आढळते. याविषयीची राजवाड्यांच्या मताची यथार्थ कल्पना येण्यास्तव हा त्यांचा अभिप्राय प्रस्तुत स्थळी आम्ही जशाचा तसा देतो.

## राजवाडेकृत गीताभाष्य

'गीतेवर मराठीत अलीकडील पंचवीस वर्षांत बरीच लिखाणे झाली. पैकी ठळक अशी चार सहज निवडता येतात :- (१) काशिनाथ वामन लेले यांची गीता, (२) भानूंची गीता, (३) टिळकांची गीता व (४) सध्याची ही राजवाड्यांची गीता. ह्या चारही विद्वान गृहस्थांची एका गीतेवरच हुलुड का ? हुलुडीचे कारण अत्यंत महत्त्वाचे आहे. समाज नावाचा एक प्राणी आहे. त्याची प्रगतीमार्गात दिशाभूल न व्हावी म्हणून त्याच्याकरिता दिशासाधनाचे यंत्र वेळोवेळी सुधरावे किंवा नवीन बनवावे लागते. या यंत्रांना वेदान्त व यांत्रिकांना वेदान्ती म्हणतात. जसा ज्या समाजाचा वेदान्त तसा त्या समाजाचा सामाजिक, राजकीय, देवधार्मिक, धार्मिक, वैय्यापारिक, यौद्धिक, वाङ्मयात्मक व शास्त्रीय संसार. इतके ह्या वेदान्ताचे अपरंपार महत्त्व आहे. कालदेशवर्तमानाकडे सूक्ष्म नजर फेकून आणि समाजाच्या वर्तमानस्वभावाची, भूत-इतिहासाची व भविष्य-उमेदीची यथातथ्य परीक्षा करून वेदान्त समाजापुढे मांडावा लागतो. अशी उत्तमोत्तम मांडणी करणारा वेदान्ती हजार पाचशे वर्षांत समाजात एखादा अर्धा निघाला म्हणजे कमाल झाली. वर्षसहस्रांनी निपजणाऱ्या ह्या वेदान्त केसरीचा अनुवाद करणारा वर्षशतांत एखाददुसरा निघाला म्हणजे बहुश: समाजाचे काम भागते, परंतु एखादे शतक असे जाते की, त्यात समाजाचा मार्गदर्शक वेदान्ती जन्मत नाही. म्हणून दिशासाधनाचे यंत्र नसल्यामुळे समाजप्राण्याचे अशा काली फार हाल होतात. वेदान्तनेत्र नसल्यामुळे अंधसमाजप्राण्याची मालमत्ता, घरदार व अक्कलहुशारी इतर समाजप्राणी हरण करतात.

अशा विपत्तींत कासावीस झालेला अंधसमाज महाताचा धावा करतो. महात म्हणून अनेक महत्त्वाकांक्षी किंवा साधेभोळे गृहस्थ त्याचेपुढे उभे राहातात, परंतु नेत्र देऊन अंधत्व घालविणारा खराखुरा धन्वंतरी अवतीर्ण होईतोपर्यंत समाजप्राण्याचे हाल सुटत नाहीत. समाजाचा चवचालपणाही लहान सामान्य नसतो. विश्वाची सबंध रचना सांगणारा व असतील नसतील त्या सर्व घरच्या व बाहेरच्या शास्त्रांच्या व कळांच्या तक्रारी जागच्याजागी ठाकठीक बसविणारा धन्वंतरी मिळाला अशी जेव्हा खात्री होते, तेव्हाच हा समाजप्राणी धन्वंतऱ्याच्या उपदेशाप्रमाणे चालण्याला राजी होतो.

धन्वंतरी म्हणविणारे असले चार गृहस्थ गेल्या पंचवीस वर्षांत उत्पन्न झाले. प्रत्येकाच्या मते रोग्याला बरी करणारी मात्रा भगवद्गीताच आहे. शंकराचार्यांच्या मताप्रमाणे समाज कर्मसंन्यासी बनला तर तो बरा होईल असे भाऊशास्त्र्यांचे (लेल्याचें) साधेभोळे म्हणणे आहे. भानूंचे स्पष्ट म्हणणे काय आहे ते स्वत: भानूंनाच कळले आहे असे दिसत नाही, तेव्हा इतरांना कळले नसल्यास नवल नाही. टिळकांचा रोख ज्ञानोत्तर कर्मावर विशेष आहे. समाजातल्या ज्ञानी व बुद्धिमान् पुरुषांनी संन्यास पत्करल्यामुळे समाज पंगू झाला. सबब समाज जर समर्थ व्हावयाचा असेल तर त्यातील बुद्धिमान स्त्रीपुरुषांनी ज्ञानोत्तर निष्काम कर्म स्वीकारले पाहिजे, असे टिळक कंठरवाने सांगतात. जो तो गीता आपल्या म्हणण्याप्रमाणे आहे, असे छातीठोक सांगतो. कारण गीतेवर रोग्याचा पूर्ण विश्वास आहे, हे प्रत्येक धन्वंतरी जाणतो. प्रस्तुत टीकेच्या ग्रंथाचे कर्ते रा. राजवाडेही कर्मयोगीच आहेत. त्यांनीही रोग्याला औषध गीतेच्या अनुपानांतूनच दिले आहे. फक्त विशेष एवढाच की, गीता अगदी आधुनिक युरोपियन शास्त्रीय वेषात कशी दिसते ते रोग्यांच्या अनुभवास राजवाडे आणू इच्छितात. टिळकांनीही युरोपियन शास्त्रांचा परामर्श घेतला आहे, परंतु टिळकांच्या परामर्शात व राजवाड्यांच्या परामर्शात जमीनअस्मानचा भेद आहे. इ. स. १८९० पर्यंत जे शास्त्र युरोपांत सिद्ध झालेले होते तेवढ्याचाच परामर्श टिळकांनी घेतलेला आहे. इ. स. १८९० च्या नंतर युरोपात शास्त्र इकडच्या तिकडे होऊन गेले. त्याचा परामर्श घेण्याचा उद्योग राजवाड्यांनी आरंभिला आहे. आत्मा, पुनर्जन्म, कर्मविपाक, विश्वरचना वगैरेचे पृथक्करण व उपपत्ती वगैरे देण्याच्या भानगडीत न पडता ह्या वस्तू गृहीत धरून टिळक गीतेचे कर्मयोगरहस्य सांगत आहेत. इ. स. १८९० नंतरच्या युरोपियन शास्त्रदृष्ट्या आत्मा, पुनर्जन्म, मानववंश, इतिहास, विश्वरचना इत्यादी वस्तूंचे पृथक्करण, उपपादन व प्रदर्शन करण्याच्या भानगडीत पडून पराभूत होण्याचे हजारो खड्डे राजवाड्यांनी आपल्या पायांखालती खणून ठेविले आहेत. मिल्ल, बेथाम, सिजविक्,

क्यॉंट्, कोंट इत्यादी पुराणवजा सौम्य शास्त्रज्ञांच्या संगतीत टिळकांचे मन रचिले गेले. हेकेल, निक्स, बर्ग्सन् इत्यादी कोऱ्या करकरीत कठोर अतिमनुष्यांच्या पुस्तकी सहवासात राजवाडे वाढले, तेव्हा संगतीदोषाची बाधा होऊन आधाराला घेतलेल्या जुन्या पुराण्या गीतेचे वाभाडे त्यांच्या हस्ते निघाले यात आश्चर्य कोणते ? तशात हेकेल, निश् वगैरे अतिमनुष्यांत व राजवाड्यांत एक महदंतर आहे. ज्या शास्त्रांसंबंधाने हेकेल वगैरे बोलतात त्यांचा साक्षात्कार हेकेल् वगैरेंना स्पष्ट झालेला आहे. इ. स. १८९० च्या अगोदरच्या किंवा नंतरच्या युरोपातील कोणत्याच शास्त्राचा राजवाड्यांना साक्षात्कार नाही. राजवाड्यांचे सर्व युरोपियन शास्त्रीय ज्ञान पुस्तकी आहे. ज्या उज्जवायूच्या एका कणात हजारो विद्युत्कणांचे आकर्षण व उत्सारण चालू आहे त्या उज्जवायूचा कण आणि आकर्षण व उत्सारण ज्यांचे घडते ते हजारो विद्युत्कण राजवाड्यांनी साक्षात् पाहिलेले नाहीत. समाजशास्त्र, मानसशास्त्र, भूस्तरशास्त्र इत्यादी शास्त्रांचाही साक्षात्कार राजवाड्यांना नाही. ज्या वस्तूंचा साक्षात्कार म्हणजे स्वानुभव नाही, त्या वस्तूंच्या वेषांत स्वत:ची एखादी वस्तू पाहाण्याचा प्रयत्न त्या वस्तूचा प्राणघात करील हें उघड आहे, वस्तूंचा अनुभव नसल्यामुळें केवळ शब्दांनी फसगत होते. Structure व Function हेच युरोपियन शब्द घ्या ना. उत्तम शरीर, उत्तम कर्म, अधम शरीर, अधम कर्म असे वर्णन राजवाडे करतात. ह्या म्हणण्याचा अर्थ असा की, शरीर व कर्म ह्या सापेक्ष राशी आहेत. सापेक्ष राशींना गणितात एकमेकांची Functions म्हणतात. शरीर हे कर्माचे Function आहे व कर्म हे शरीराचे Function आहे. जसे $x$ हे $x^2$ चे Function आहे व $x^2$ हे $x$ चे Function म्हणजे सापेक्ष राशिसंबंध. ह्या Function ला राजवाडे आत्मा म्हणतात. आत्मा म्हणजे राजवाड्यांच्या मते कर्म. कर्म म्हणजे चलन. आत्मा व कर्म भारतीय वेदान्तात निराळी मानली आहेत. राजवाड्यांच्या वेदान्तांत एक मानली आहेत. युरोपियन वेदान्तात आत्मा म्हणजे कर्म निखालस नाही. तेव्हा हा सर्व गोंधळ Function या शब्दाच्या अर्थाची उपपत्ती यथातथ्य न झाल्यामुळे होतो हे स्पष्ट आहे. तात्पर्य, युरोपियन शास्त्रांचा साक्षात्कार म्हणजे स्वानुभव राजवाड्यांना नाही. अर्थात् युरोपियन शास्त्रदृष्टीने गीतेची परीक्षा करण्याचा अधिकार त्यांचे ठायी नाही. लेले, भानू, टिळक व राजवाडे यांच्या प्रयत्नांवरून येवढे मात्र स्पष्ट दिसत आहे की, ख्रिश्चन, मुस्लिम, हिंदू व बौद्धसंस्कृतीचा व शास्त्रांचा खल करून एकादे दर्शन महाराष्ट्रात निपजण्याचा काल महाराष्ट्रात जवळ येत चालला आहे.

राजवाड्यांच्या प्रयत्नांत मुख्य दोष कोणता तो प्रथम सांगितला. आता गुण सांगतो.

भाष्यकारांचे इंग्रजी ग्रंथांचे वाचन चांगले आहे. ग्रीक, मध्यकालीन व आधुनिक युरोपियन वेदान्त, नीति, समाज व भौतिकशास्त्रे यांचा दांडगा पुस्तकीपरिचय ग्रंथकारांना आहे आणि इतकें असून केवळ स्वजनप्रेमातिशयाने त्यांनी स्वभाषेला सोडले नाही. ग्रंथकारमहाशयांचा हा आम्ही फार मोठा गुण समजतो'. (इतिहास आणि ऐतिहासिक मासिक वर्ष २ रे अंक १३ वा)

अध्यात्मज्ञान विचाराविषयी राजवाड्यांच्या मताचे दिग्दर्शन केल्यावर भौतिक शास्त्रीय ज्ञानविचाराविषयी त्यांनी प्रदर्शित केलेल्या विचाराचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे याचे आता आम्ही दिग्दर्शन करतो.

इ. स. १९०५ सालांत राजवाड्यांचा म. इ. सा. खंड ६ प्रसिद्ध झाला. या ग्रंथाचे प्रस्तावनेत भरतखंडांतील लोकांनी भौतिक शास्त्रीय ज्ञानाचे बाबतीत पाश्चात्यांची बरोबरी केली पाहिजे व त्याखेरीज पाश्चात्त्यांच्या दास्यांतून त्यांची मुक्तता व्हावयाची नाही हे मत स्पष्ट व निश्चितपणे राजवाड्यांनी प्रस्तावनेतील खालील उताऱ्यात नमूद केले आहे.

'उदाहरणार्थ शके १२०० पासून शके १७७९ पर्यंत महाराष्ट्रसमाजचरित्र पाहिले व तदाश्रयभूत शोध केला म्हणजे असे कळून येते की, ही ५७९ वर्षे महाराष्ट्रसमाज तात्त्विक स्थितीत आहे, आणि त्याची गांठ परस्वापहरण करणाऱ्या पाश्चात्त्यांशी पडली आहे. संन्यासप्रवण व समाजद्वेष्ट्या तात्त्विक स्थितीत राष्ट्रीयभवन व शत्रुनिर्दलन अशक्य होते. या दोन गोष्टी साधण्यास प्रपंचप्रवण व समाजसाधक अशा रामदासी तत्त्वज्ञानाचा उपयोग फार होतो, **परंतु शास्त्रीय स्थितींत असलेल्या शत्रूंचें उच्चाटन करण्यास स्वत:चा समाज शास्त्रीय स्थितीप्रत नेला पाहिजे. असे अनेक बीजभूत सिद्धांत समाजचरित्र, समाजशास्त्र व समाजतत्त्वज्ञान यांच्यापासून होत असतात. समाजचरित्राची बीजे कळली नाहीत म्हणजे समाजहित साधण्याची बुद्धी असूनही समाजहित साधता येत नाही, हे उघडच आहे. रोगस्थान कळल्याशिवाय औषधोपचार कोठे करावयाचा व शक्तिस्थान कळल्याशिवाय तिची वृद्धी कोठून व्हावयाची ?''**

( म. इ. साधने खंड ६, कै. विष्णु गोविंद विजापुरकर - प्रकाशित प्रस्तावना - परिच्छेद ६९ )

इ. स. १९०५ पासून इ. स. १९२६ साली राजवाड्यांच्या निधनापावेतो वेळोवेळी याच सिद्धांताचे राजवाड्यांनी अनेक लेखांत स्पष्टीकरण करून पुरस्कार केला आहे. स्वराष्ट्राच्या उद्धाराच्या उपायांचे चिंतन राजवाड्यांच्या मनात सतत चालू असे. हे चिंतन चालू असता या संबंधाचे जे विचार त्यांच्या मनात निरनिराळ्या वेळी येत

त्यांची टिपणे ते तयार करून ठेवीत. ही सर्व टिपणे आम्ही संशोधक त्रैमासिकांत छापली असून त्यांचा उल्लेख या ग्रंथाच्या पुढील भागांत निरनिराळ्या स्थळी आला आहे. यास्तव त्यांचा उल्लेख प्रस्तुत स्थळी आम्ही करीत नाही, तथापि याविषयी राजवाड्यांच्या मतांची वाचकांस निश्चित कल्पना होण्याच्या दृष्टीने दोन गोष्टींचा प्रस्तुत स्थळी आम्ही उल्लेख करतो. इ. स. १९१६ साली पुण्याच्या वसंतव्याख्यानमालेत कै. विजापूरकर यांच्या अध्यक्षतेखाली मे महिन्यात राजवाड्यांचे एक व्याख्यान झाले. त्या व्याख्यानात भौतिक शास्त्रीय ज्ञानाची महती, आपल्या लोकांचे ठायी असलेल्या या ज्ञानाचा पूर्ण अभाव, या अभावामुळे इंग्रजांचे दास्यात जीवित्व कंठण्याचा प्रसंग, इंग्रजांच्या दास्यातून मुक्तता करून घेण्यास्तव युक्त उपायांचे चिंतन इत्यादी मुद्द्यांविषयीचे त्यांनी उत्कृष्ट दिग्दर्शन केले आहे. वर दर्शविल्याप्रमाणे ज्या मुद्दयांचे राजवाड्यांनी विवरण केले आहे त्याच मुद्दयांचें विवरण श्री. न. चिं. केळकर यांनी लिहिलेल्या 'मराठे आणि इंग्रज' या ग्रंथाच्या परीक्षणात्मक लेखांत राजवाड्यांनी खालीलप्रमाणे केले आहे.

'शिवकाली औरंग्याच्या मिशा उपटणारे मराठे वीर मूठभर इंग्रजांपुढें भागूबाईसारखे नमतात हा काय चमत्कार आहे ? अवरंगझेबाचे वेळी जे मराठे सहकार्य, उद्योग, शौर्य ह्यांबद्दल परम प्रख्यात पावले होते ते इंग्रजांच्या पुढें विस्खळित, आळशी, भेकड कसे दिसू लागले ? येथे शास्त्रीबाबा म्हणतात की, मराठ्यांच्या अंगी आळस वगैरे दुर्गुण कायमचेच खिळलेले आहेत, परंतु चवकस चिकित्सक या प्रश्नाचें निराळें उत्तर देईल. तो १८१८ तल्या पळकुट्या व घाबरलेल्या मराठ्यांची कसून जबानी घेईल, आणि त्याला विचारील की, बाबा ! तू इतका भ्यालास कोणाला ? इंग्रज नामक द्विपादाला की काय? आम्हाला खात्री आहे की, ह्या प्रश्नाला मराठ्यांचे उत्तर असे येईल की, आम्ही ताम्रमुखांना भ्यालो नाही, त्यांच्या लांब पल्ल्याच्या तोफांना व शास्त्राला भ्यालो. ह्या उत्तरात १८१८ तील सर्व इतिहासाचे सार भरलेले आहे. युरोपच्या भौतिक शास्त्रांपुढे महाराष्ट्राला नमावे लागले. दारूने झिंगणाऱ्या, महिन्यापंधरवाड्याने स्नान करणाऱ्या, स्त्रियांचे पुनर्विवाह लावणाऱ्या व रानटी नाच करणाऱ्या युरोपाने मद्यनिवृत्त, शुचिर्भूत, पतिव्रतासंपन्न व संभावित महाराष्ट्राला कसे जिंकले हे कोडे अन्यथा सोडविणें दुरापास्त आहे. खोटे दस्तऐवज बनविणाऱ्या व बेगमांच्या चोऱ्या करणाऱ्या हेस्टिंग्सपुढें पापभीरु व एकवचनी नाना फडणीस फिका कशाने पडला ? लांब पल्ल्याच्या तोफा जवळ नसल्याने. खर्ड्याच्या लढाईंत निजामाचा पराभव कशानें झाला ? लांब पल्ल्याच्या तोफा जवळ नसल्याने. १८०३ मध्ये शिंदे, होळकर वगैरेंचा पराभव इंग्रजांनी कशाच्या बळावर केला ? लांब

पल्ल्याच्या तोफांच्या बळावर. क्लाइव्हनें तुळाजी आंग्र्याला कशानें पाडला ? पल्लेदार तोफांनी. तात्पर्य, पल्लेदार हत्यारांच्या जोरावर सद्‌गुणी, एकजूट व उद्योगी लोकांचा पराभव दुर्गुणी, रोगी, विभक्त व ऐदी लोकही करू शकतात. पल्लेदार हत्यारांपुढे सर्व सद्‌गुण फिके पडतात व नसतील ते दुर्गुण समाजांत प्रादुर्भूत होतात. विधवांची लग्ने लावल्याने किंवा दारू प्यायल्याने, किंवा गोमांस खाल्ल्याने, किंवा आकाशाकडे डोळे मिटून प्रार्थना केल्याने किंवा एकपत्नीव्रताने, किंवा वेदाध्ययनाने किंवा कुराण पढण्याने किंवा पोकळ व्याख्यानांनी स्वराज्य मिळत नसते व हरतही नसते. बाजीराव भित्रा, पळकुटा, संशयी, देशबुडव्या व पाजी असून त्याच्या सेनानीजवळ जर पल्लेदार हत्यारें व ती तयार करण्याची साधने असती, तर तो स्वराज्य एकाएकी गमावता ना आणि चुकून गफलतीने गमावता तर ते क्षणमात्रात परत मिळविल्याशिवाय राहाता ना. तात्पर्य, राष्ट्रांचे स्वातंत्र्य व राष्ट्रांचे पारतंत्र्य पल्लेदार हत्यारांवर अवलंबून असते. मराठ्यांचे स्वराज्य जाण्याचे एकच एक कारण पल्लेदार हत्यारांचा अभाव हे होय. आळस वगैरे सर्व कारणे गौण होत, किंबहुना ही कारणेच न होत. असो. खरेशास्त्र्यांनी स्वराज्यनाशाचे एकच एक असाधारण कारण पल्लेदार हत्यारांचा अभाव म्हणून सांगितले असते म्हणजे त्यांचे लिहिणे शाळाशुद्ध झाले असते व त्यांचे शिष्य जे नरसोपंत केळकर त्यांची आपली केस सांवरता तिरपीट उडाली नसती, आणि त्यांनी आरंभिलेला श्राद्धोत्सव महाराष्ट्रातील आबालवृद्धांच्या सहानुभूतीस व आदरास पात्र झाला असता'. (इतिहास आणि ऐतिहासिक वर्ष २ अंक १९ ज्येष्ठ शुद्ध १ शके १८४० इतिहाससंशोधनाची अलीकडली प्रगती हा मुखपृष्ठावरील लेख.)

या उताऱ्यांत मराठ्यांच्या अध:पाताची मीमांसा राजवाड्यांनी उत्कृष्ट प्रकारची केली असून भौतिक शास्त्रीयज्ञान हेच कोणत्याही राष्ट्राच्या श्रेष्ठत्वास व वर्चस्वास कारणीभूत होते व मराठ्यांपाशी या ज्ञानाचा अभाव व इंग्रजांपाशी त्याचा भरपूर पुरवठा असल्यामुळे मराठ्यांचा पाडाव होऊन हिंदुस्थानची राजकीय सत्ता मराठे पराभव पावून इंग्रजांचे हाती गेली, हा सिद्धांत राजवाड्यांनी प्रतिपादिला आहे. हा सिद्धांत राजवाड्यांना जितक्या तीव्रतेने भासला व त्यांनी तो जितक्या स्पष्टपणे पुकारला तशा प्रकारे राजवाड्यांपूर्वी महाराष्ट्रात उदयास आलेल्या विचारवंत नेत्यांपैकी कोणीच प्रतिपादिला नाही. राजवाड्यांच्या विचारसंप्रदायाचे हेच वैशिष्ट्य आहे. लॉर्ड बेकनने इ. सनाच्या सोळाव्या शतकांत इंग्लंड देशांतील परंपरागत चालत आलेल्या शाब्दिक व पोकळ ज्ञानविचारचर्चा व वाद यांस जसा जबरदस्त धक्का दिला व त्यांचे उच्चाटन केले व भौतिक शास्त्रीयज्ञानाची

अनुनयन पद्धतीनें (Inductive method) प्राणप्रतिष्ठा करून इंग्रज लोकांच्या मनास व विचारास नवे वळण लावले त्याच प्रकारचे कार्य महाराष्ट्रांत घडवून आणणे हे राजवाड्यांच्या विचारसंप्रदायाचे ध्येय व वैशिष्ट्य होते असे आम्ही निश्चित विधान करतो.

राजवाडे महाराष्ट्राचे निर्धन विचारी नेते होते. राष्ट्रोद्धाराचा युक्त व खरा मार्ग कोणता हे जरी त्यांना पूर्णपणे अवगत झाले होते, तथापि त्यांच्या विचारास मूर्त रूप देण्यास लागणारे अफाट द्रव्य व कर्तृत्वशक्ती त्यांच्यापाशी नव्हती. 'उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथा:' अशी राजवाड्यांची स्थिती होती. यामुळे राष्ट्रोद्धाराच्या खऱ्या मार्गाविषयी चिंतन व विचारप्रदर्शन यापलीकडे भरीव कार्य करण्याचे भाग्य त्यांना लाभले नाही.

पाश्चात्त्य ग्रंथांच्या विस्तृत वाचनाने, त्याचप्रमाणे गतकालीन महाराष्ट्राच्या इतिहासाच्या परिशीलनाने व प्रस्तुतच्या महाराष्ट्रीय सुशिक्षित समाजाच्या निरीक्षणाने राजवाड्यांचा जो वरील विचारसंप्रदाय बनला गेला त्याच प्रकारचा सांप्रदाय मुंबई प्रांताच्या धनाढ्य पारशी समाजापैकी परलोकवासी श्रीमंत जमशेटजी नसरवानजी टाटा या नावाच्या एका उदारधी पारशी गृहस्थाचा बनला गेला होता. श्रीमंत जमशेटजी नसरवानजी टाटा यांचा जन्म इ. १८३९ सालांत नवसरी येथे झाला. त्यांच्या वयाच्या ६५ व्या वर्षी म्हणजे इ. स. १९०४ साली ते मयत झाले ! टाटांना उच्च प्रतीचे विश्वविद्यालयीन शिक्षण मिळाले नव्हते, परंतु त्यांच्या वडिलांच्या हाँगकाँग येथील व्यापारी पेढीचा कारभार चालविण्यात त्यांना प्राप्त झालेले श्रेष्ठ प्रतीचे व्यावहारिक ज्ञान व चातुर्य व जगातील सर्व देशांत त्यांनी केलेल्या विस्तृत प्रवासामुळे त्यांना प्राप्त झालेला अनुभव व कोणत्याही राष्ट्राच्या ऐहिक वैभवाच्या व भरभराटीच्या कारणांचे सत्य ज्ञान यांच्या योगानें राजवाड्यांना ज्या गोष्टी अन्य मार्गांनी अवगत झाल्या त्या टाटा यांना पूर्णपणे अवगत झाल्या होत्या. श्री. वाच्छा यांनीं टाटांचे जे चरित्र लिहिलेले आहे त्यांतील खालील महत्त्वाचे उताऱ्यावरून त्यांच्या विचारसंप्रदायाच्या स्वरूपाची यथातथ्य कल्पना होणार आहे.

"He was fully convinced that the future of the country lay in one direction in the successful pursuit of science which may in another direction be practically called to the aid of large industries which need fostering and developing in India. With her many rich but un explored resources. ... ... ... ... ... ...

"The prosecution of science, he believed would immensely benifit future generations of India humanity and conduce to their

greater; material prosperity. Science was the help mate of industry. That was the root idea which had so long been revolving in his mind. That idea he resolutely resolved to put into practial execution." Page 52.

"Thus at the very meridian of prosperity Mr. Tata had demonstrated the value of swadeshism in matters industrial and commercial. No academic person, his motto was action, action, action. Action was the key to all his enterprises. They were not to be mere paper ones. The abstract had to be translated in the terms of the concrete. A practical man, he showed the way to his countrymen how wealth acquired may be put to the best productive uses which might benifit the country and advance the people a stage forward in their struggle for material prosperity." (The Life and work of J. N. Tata by D. E. Wacha page 43-44).

या उताऱ्यात दर्शविल्याप्रमाणे भरतखंडाच्या उद्धाराच्या खऱ्या मार्गाविषयीच्या टाटांच्या कल्पना निश्चित झाल्यावर त्यांनी त्यास मूर्तरूप देण्यास्तव कोणत्या संस्था मूर्तरूपाने अस्तित्वात आणणे जरूर आहे, हे ठरविले. भौतिक शास्त्रज्ञानाच्या संशोधनार्थ व जोपासनार्थ एक संस्था, लोखंड तयार करण्याचा एक कारखाना व महाराष्ट्रांतील सह्य पर्वतावरून पडणाऱ्या पाण्याची मोठी धरणे बांधून त्यातील पाण्यापासून विद्युत्शक्ती निर्माण करण्यास्तव कारखानाही सुरू करण्याचे त्यांनी ठरविले. भौतिक शास्त्रीय ज्ञानाच्या संशोधनार्थ व जोपासनार्थ स्थापन करण्याच्या संस्थेस तीस लाख रुपये देणगी देण्याचा त्यांनी संकल्प केला. लोखंडाचा कारखाना जमशेटपूर येथे स्थापन करण्याचे त्यांनी ठरविले. त्याचप्रमाणे विद्युत्शक्ती उत्पन्न करण्याचा कारखाना लोणावळे व त्याच्या सन्निधच्या गांवी स्थापण्याचे त्यांनी ठरविले. या सर्व संस्था प्रत्यक्ष स्थापन होण्यापूर्वीच टाटा इ. स. १९०४ साली निधन पावले, परंतु या सर्व संस्था त्यांच्या पश्चात त्यांचे सुपुत्र सर दोराब टाटा व सर रतन टाटा यांचे नेतृत्वाखाली स्थापिल्या गेल्या. इ. स. १९०७ सालीं लोखंड तयार करणाऱ्या कंपनीच्या कारखान्याची, इ. स. १९११ साली विद्युत्शक्ती निर्माण कंपनीची व इ. स. १९११ सालांत बंगलोर येथील सायंटिफिक रिसर्च इन्स्टिट्यूची स्थापना झाली. या तीनही संस्थांविषयी टाटांच्या चरित्रकाराने व्यक्त केलेले खालील अभिप्राय अत्यंत महत्त्वाचे आहेत :-

The three Institutions described in this chapter form an imperishable monument to the talent, foresight and patriotic prudance of Mr. Tata. Epochmaking as they are in their charactor, they are certain to endure and confer lasting benifits on his countrymen for generations to come.

( The life and work of J. N. Tata - page 71 ).

टाटांपाशी राजवाड्यांची विचारसरणी व तिला मूर्तरूप देण्यास लागणारी अपरंपार संपत्ती असल्यामुळे भरतखंडाचे परमहित करणाऱ्या वरील जगड्व्याळ संस्था अस्तित्वात आल्या व या महत्कार्यामुळे भविष्यकाळी भरतखंडाचे उद्धारकर्ते म्हणून त्यांचे नाव भरतखंडाच्या इतिहासात अजरामर होईल.

भौतिक शास्त्रीय ज्ञानांत पाश्चात्त्य राष्ट्रांतील लोकांची बरोबरी भरतखंडातील लोकांनी केल्याखेरीज आपल्या देशाची पारतंत्र्यातून व परदास्यातून मुक्तता होणार नाही या राजवाडे प्रतिपादित सिद्धांताची सत्यता, सन १९१४ सालच्या महायुद्धापासून आजतागायतचा जो एकतीस वर्षांचा काळ गेला त्या काळात पाश्चात्त्य राष्ट्रांतील शास्त्रज्ञांनी भौतिक शास्त्रीय ज्ञानाच्या प्रदेशांत केलेले अपूर्व शोध व त्यांचे जगताच्या राजकीय, आर्थिक, औद्योगिक व सामाजिक घटनांवर झालेले परिणाम लक्षात घेतले असता, कोणासही सहज पटण्यासारखी आहे. भयंकर विध्वंस करणारी राबाट प्लेन्स्, मानवी जीवनाचा बचाव करणारी पेनसिलीन व डीडीटीसारखी दिव्य औषधें, इंग्लंडहून हिंदुस्थानात दीड दिवसांत येणारी वेगवान विमाने इत्यादींचे शोध या काळात अगदी अलीकडे झाले आहेत. पाश्चात्त्य देशांत झालेल्या या भौतिक शास्त्रीय प्रगतीचा परिणाम भरतखंडांतील विद्वानांवर झाल्याखेरीज राहिला नाही. सन १९१४ सालच्या महायुद्धाचे काळी हिंदुस्थानात एकही भौतिक शास्त्रज्ञ उदयास आला नाही. या महायुद्धाचे काळात पंधरावीस हिंदी भौतिक शास्त्रज्ञ उदयास आले असून त्यांनी काही नाव घेण्यासारखे शोध लावले आहेत. या प्रख्यात पावलेल्या भौतिक शास्त्रज्ञांपैकी सर शांतिस्वरूप भटनागर गव्हर्नमेंट ऑफ इंडियाचे डायरेक्टर जनरल ऑफ सायंटिफिक आणि इंडस्ट्रियल रिचर्स, डॉक्टर नाझीर अहंमद, ज्ञानचंद्र घोष डायरेक्टर ऑफ बंगलोर रिचर्स इन्स्टिट्यूट, कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या कॉलेज ऑफ सायन्सचे प्रोफेसर एस. आर. मित्र यांचे शिष्टमंडळ हिंदुस्थान सरकारने इंग्लंडमधील भौतिक शास्त्रीय व औद्योगिक संस्थांच्या प्रमुखांच्या गाठी घेऊन त्यांच्याशी विचारविनिमय करण्याकरिता व त्या संस्थांची पाहणी करण्याकरिता पाठविले आहे. या

शिष्टमंडळाने इंग्लंडमधील आपले काम संपवून अमेरिका खंडाकडे प्रवास करण्यास निघण्यापूर्वी या शिष्टमंडळाचे प्रमुख सर शांतिस्वरूप भटनागर यांनीं भरतखंडाच्या राजकीय पुढाऱ्यांस जो खालील जाहीर संदेश दिला तो अत्यंत महत्त्वाचा असल्या कारणाने आम्ही जसाच्या तसा येथे उद्धृत करतो.

"India is on the threshold of great developments in which science and technology will play a prominent part. Wise men of India should put their heads together and not forget that without these developments no amount of effort will lead to great results. I therefore implore the leaders of India to give scientific and industrial development their deepest thought and to give very high priority to the economic development of the country in their political thinking. Industries in India which must be developed immediately, are power fuel, fertilisers, transport and food production. During our tour of Britain, we have seen the great achievements of the British people in their industries, particularly with regard to Britain's wonderful war effort and their achievements would be an object lesson for India."

(Sir Shantiswarup Bhatnager Explanatory message for India today)

-- Times 4-12-44

या संदेशात सर शांतिस्वरूप भटनागर यांनी राजवाडेप्रतिपादित सिद्धान्ताची पुनर्घोषणा केल्याची, मागे जे आम्ही विवेचन केले आहे, त्यावरून कोणाचीही खात्री झाल्याखेरीज राहणार नाहीं. हिंदी राजकीय पुढारी साक्षात कार्य घडवून आणण्याचे बाबतीत या संदेशान्वये जितकी प्रगती करतील त्या प्रमाणात परदास्यातून व पारतंत्र्यातून भरतखंडाची मुक्तता करण्याचा पल्ला ते गाठतील यात संशय नाही.

सर शांतिस्वरूप भटनागर व अन्य हिंदी शास्त्रज्ञ यांनी अमेरिकेतील प्रवास पुरा करून हिंदुस्थानास निघण्यापूर्वी वरीलप्रमाणे दुसऱ्या एका संदेशाची घोषणा केली आहे, ती घोषणा खाली देतो.

"We were really surprised to learn that even though there was a desire in the United Kingdom to have important operation

research and research for development of war weapons carried out in India as has been done in Canada, this policy was not adopted in India. For the success of any plan for the economic development of India, the first requisite is the creation of the necessary technical personnel.

"It will, however, be unwise to depend on foreign countries for long for the training of technologists. The Mission will recommend to the Government that generous financial provision be made to raise the standards of and widen the scope in the existing institutions and also bring into existence fresh institutions where necessary."

The party finally expresses the opinion that not much good will come out of discussion about the relative merits of private enterprise versus State management of industry and agriculture. It believes that every party should do its part.

## NATIONAL GOVERNMENT

"For developing India we must use to the fullest extent her natural resources and for this purpose there should be a National Government at the Centre as well as at the Provinces".

"This view." added the Mission, "was advocated by all of us in the course of our lectures and conversations in the United Kingdom and we were happy to find that most of the scientists, administrators and industrialists fully endorsed this view.

"Mr. Amery and other members of the Cabinet told us repeatedly that India now enjoys the fullest freedom regarding her economic development, and if she fails to take any effective measures in this direction the responsibility rests solely with the members of the Government of India."

( Times of India-New Delhi-February 12-1945)

या घोषणेत जी भाषा वापरण्यात आली आहे ती महत्त्वाची व लक्षात ठेवण्यासारखी आहे. युद्धोपयोगी शस्त्रास्त्रें व अन्य सामग्रीच्या निर्मितीस्तव कनडा देशाप्रमाणें संशोधनाचा विकास हिंदुस्थानात व्हावा अशी इंग्लंडांतील शास्त्रज्ञांची इच्छा असताही या इच्छेनुसार

हिंदुस्थानात काहीच करण्यात येत नाही हे हिंदी शास्त्रज्ञांचे मत सर्वस्वी खरे आहे. हिंदी लोकांनी भौतिक शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीस्तव व तद्द्वारें देशाच्या यान्त्रिक व औद्योगिक विकासास्तव कोणत्याही परकीय देशावर अवलंबून राहू नये असा जो इशारा या संदेशात दिला आहे, तोही युक्त आहे.

भौतिक शास्त्रांचा अभ्यास व विकास हिंदी लोकांनी स्वत: करून पाश्चात्त्य राष्ट्रातील लोकांची बरोबरी केल्याखेरीज हिंदी स्वातंत्र्याचा व स्वराज्याचा बिकट प्रश्न सुटणार नाही या राजवाडेप्रणीत सिद्धान्तावर असा आक्षेप घेण्यात येत असे व आजही कित्येकांकडून घेतला जाईल की, भौतिक शास्त्रीय ज्ञानाचा व हिंदुस्तानाच्या यांत्रिक व औद्योगिक विकासाचा जोराचा प्रयत्न हिंदुस्थानसरकार परकीय असल्यामुळे केला जात नाही व स्वराज्य झाल्याखेरीज ही गोष्ट साध्य होणे शक्य नाही. हा आक्षेप प्रस्तुतच्या महायुद्धास लागणारी शस्त्रास्त्रे, विमाने, मोटारी, रणगाडे तयार करण्याच्या कारखान्यापुरता खरा आहे, परंतु हिंदी विद्वान शास्त्रज्ञ व संशोधक यांनी स्वतंत्रपणे भौतिक शास्त्राचा अभ्यास व संशोधन करण्याचा निश्चय केल्यास त्यावर हिंदुस्थान सरकार नियंत्रण घालू शकत नाही. पुण्याचे श्री. श्री. द. लिमये यांनी कपिलाश्रम ही संस्था पुण्यास स्थापन करून संशोधनाचे कार्य एकट्याच्या हिमतीवर उत्कृष्ट प्रकारचे केले असून काही नामांकित शोधही केले आहेत. अशा प्रकारचे प्रयत्न फार वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील बुद्धिमान लोकांनी केले असते तर प्रस्तुतच्यापेक्षां कितीतरी अधिक पटीने भौतिक शास्त्रीय ज्ञानात हिंदी लोकांची प्रगती झाली असती. ही गोष्ट लक्षात घेतली असता राजवाड्यांच्या सिद्धान्तावर घेण्यात येणारा वरील आक्षेप निष्फळ ठरतो.

हिंदुस्थानातील लोकांची भौतिक शास्त्रीय ज्ञानांत प्रगति व्हावी असे इंग्रज राज्यकर्त्यांस प्रस्तुत महायुद्ध सुरू झाल्यापासून दोन-तीन वर्षे लोटल्यावर अलीकडे वाटू लागले आहे. हिंदुस्थानात भौतिक शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीस्तव इंडोब्रिटिश सहकार्याची योजना आखण्यास्तव प्रोफेसर ए. व्ही. हिल यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांचा या विषयीचा एक रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. लंडनमध्ये भौतिक शास्त्रीय शोधार्थ एक कचेरी स्थापन करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे. महायुद्धाच्या सुरवातीपासून भौतिक शास्त्रीय शोधास्तव हिंदुस्थान सरकार बरीच मोठी रक्कम खर्च करीत असून ही रक्कम दरसाल अधिक प्रमाणात खर्च करण्याचा त्यांचा विचार आहे. हिंदुस्थान सरकार आता दर्शविल्याप्रमाणे किती गोष्टी किती प्रमाणात साक्षात् अमलात आणते हे पहाणे आहे. (टाइम्स ऑफ इंडियाचा अग्रलेख ता. ३ फेब्रुवारी १९४५)

वरील योजनांशिवाय हिंदुस्थान सरकारनें खालील विषयांसंबंधी भौतिक शास्त्रीय ज्ञान मिळविण्यासाठी दरसाल पांचशे हिंदी विद्यार्थी इंग्लंड व अमेरिकेत शिक्षण घेण्याकरता पाठविण्याचा संकल्प केला आहे. *

§ येथपावेतो दर्शविलेल्या प्रकारची विचारप्रणाली व तदनुसार योजना साक्षात अमलात आणल्या गेल्यास या भागाचे मथळ्यावर राजवाड्यांची जी उक्ती उद्धृत केली आहे तीत दर्शविल्याप्रमाणे भौतिक शास्त्रीय ज्ञानात हिंदी लोकांची पाश्चात्त्य राष्ट्रांतील लोकांशी बरोबरी करण्याची पात्रता येण्याचा व इंग्रजांच्या दास्यातून त्यांची सुटका होण्याचा संभव आहे.

राजवाड्यांच्या चरित्राची पार्श्वभूमी व त्यांच्या विचारसंप्रदायाचे वैशिष्ट्य या विषयीचे स्थूल दिग्दर्शन या भागात आम्ही केले असून पुढील भागात या विषयीचे विस्तृत विवेचन करण्यात येणार आहे हे नमूद करून हा भाग आम्ही येथे समाप्त करतो.

## पुरवणी

सन १९४४ च्या नाताळच्या सुटीत पुणे शहरी सायन्स काँग्रेस भरली होती. बंगलोर इन्स्टिट्यूटचे संचालक श्री. सी. व्ही. रामन् यांची या प्रसंगी पुण्याच्या नागरिकांच्या जाहीरसभेत २/३ व्याख्याने झाली. त्यांच्या एका व्याख्यानात भौतिक शास्त्रांत प्रावीण्य मिळविलेल्या काही विद्यमान विद्वान संशोधकांची नावे त्यांनी पुढे दिल्याप्रमाणे निवेदन केली. १ के. एस. कृष्णन, २ आर. एस. कृष्णन्, ३ के. आर्. रामनाथन्, ४ बाबू सुधांशुकुमार बानर्जी, ५ एल्. जे. रामदास, ६ वैद्यनाथन्, ७ एस्. के. मित्र, ८ एस्. भगवतन्. ९ एस्. रामचंद्रराव, १० विधुभूषण रे, ११ सी. एस्. व्यंकटेश्वरन्. १२

---

* ज्या विषयांच्या अभ्यासाकरितां विद्यार्थी पाठवावयाचे आहेत ते विषय खालीं दिले आहेत :- ( काळ, ता. ३०-१-४५ ).

१ शेतकीसंबंधीं विषय-पशुपालनासहित, २ शिक्षणशास्त्र व त्याची अम्मलबजावणी, ३ मेकॅनिकल इंजीनियरिंग, ४ इलेक्ट्रिक इं., ५ सिव्हिल इं.,

६ केमिकल इं., ७ हवाई इं., ८ आरमारी इं., ९ आर्किटेक्चर, रीजनल प्लॅनिंग व बिलिंडग कन्स्ट्रक्शन, १० आलाइड केमिस्ट्री (धान्यवांटप आणि त्याची निगा राखणेंसहित ), ११ आलाइड फिजिक्स, १२ जिऑलजी, १३ मेटॅलर्जी

१४ अप्लाइड सायन्सचे इतर प्रकार, १५ वरील विषयांशिवाय इतर तांत्रिक विषय.

केदारेश्वर बानर्जी, १३ आर्. एन्. घोष, १४ विजयराघवन्, १५ वैद्यनाथस्वामी, १६ के. एस्. आयंगार, १७ माधवराव, १८ पी. सी. महालनवीस, १९ मेघनाथ सहा, २० सत्येंद्रनाथ बोस, २१ एच्. जे. भाभा, २२ नगेंद्रनाथ, २३ पी. आर्. शेषाद्रि, २४ एस्. ए. भटनागर, २५ जे. एन्. मुकर्जी, २६ बीरबल सहानी, २७ टी. एस्. व्यंकटरमन् २८ के रामय्या, २९ अनंत कृष्णअय्यर, ३० शरच्चंद्र रॉय, ३१ सर रामन्.

सर रामन् यांना महाराष्ट्रातील भौतिक शास्त्रांच्या संशोधकांची नावे परिचित नसल्या कारणाने त्यांचा उल्लेख या नामावळीत आला नाही; तथापि सध्या खाली दिलेले महाराष्ट्रीय भौतिक शास्त्रांचे संशोधन करीत आहेत.

१ डॉ. दत्तोपंत लिमये (पुणें); २ के. एस्. नरगुंद (अमदाबाद), ३ आर्. सी. शहा (मुंबई), ४ आर्. डी. देसाई (मुंबई), ५ डॉ. मो. वा. चिपळूणकर (पुणें), ६ रा. के. दीक्षित (अहमदाबाद), ७ डॉ. शं. पु. आघारकर (कलकत्ता), ८ डॉ. श्री. स. जोशी (बनारस) याप्रमाणें महाराष्ट्रांतील संशोधक विद्यमान् आहेत. रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मुंबई या संस्थेचे मुख्य यांनीं डॉ. लिमये यांजविषयीं खालील अभिप्राय व्यक्त केला आहे.

" He has earned reputation in the international chemical world for the Brillient work that has come out of his laboratory."

अगदी अलीकडे महाराष्ट्रातील कर्नल सोखे यांनी आजपावेतो जगातील कोणत्याही शास्त्रज्ञाने न लावलेला सर्पदंशावरील लशीचा शोध लावून ती मुंबईच्या हाफकिन इन्स्टिट्यूटमध्ये तयार केली आहे. कोणत्याही प्रकारच्या सर्पाचा दंश ही लस टोचली असता सर्पदंश झालेला मनुष्य न दगावता पूर्णपणे बरा होतो.

सन १९१४ च्या महायुद्धाचे वेळी हिंदुस्थानात भौतिक शास्त्रांच्या ज्ञानाचे संशोधन करणारे दोन-चार संशोधक नव्हते तेथे त्याच आपल्या देशात ४० नामवंत भौतिक शास्त्रज्ञ उदयास आलेले पाहून भरतखंडाच्या भवितव्याविषयी निराश होण्याचे कारण नाही.

***